



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १३१ । किंमत - २ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । ३१/०५/२०२६ । पाने -८




## आशीर्वाद पतसंस्थेचा सोलर प्रकल्प कार्यान्वित

### बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते उद्घाटन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील छोटया-मोठया उद्योग व्यवसायीकांची कामधेनू समजल्या जाणाऱ्या आशीर्वाद नागरी सहकारी पतसंस्थेतील रूटटॉप सोलर १०केडब्ल्यू प्रकल्पाचे उद्घाटन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या पाल्यांना शालेय साहित्यवाटून त्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी उद्योजक डॉ. संजय मालपाणी, माजी नगराध्यक्ष दिलीपराव पुंड, चेअरमन अरूण ताजणे, व्हा. चेअरमन रविंद्र पावबाके, अरूण हिरे, गजेंद्र अभंग, बाळासाहेब ढोले, सुधाकर ताजणे, विष्णू ढोले, अतुल अभंग, मालती डाके, नितीन अभंग, रामनाथ अभंग यांच्यासह संचालक उपस्थित होते.

यावेळी बाळासाहेब थोरात यांनी आशीर्वाद नागरी सहकारी पतसंस्थेच्या कामाचे व प्रगतीचे कौतूक केले. सभासदांचा, ठेवीदार, कर्जदारांचा विश्वास सार्थ ठरवत या पतसंस्थेने मोठी भरारी घेतली आहे. केवळ व्यवसाय म्हणून नाही तर सामाजिक उपक्रमात नेहमीच या संस्थेचा पुढाकार असतो. असे गौरोद्गार यावेळी बाळसाहेब थोरात यांनी काढले. डॉ. संजय मालपाणी यांनी देखील आशीर्वाद पतसंस्थेच्या प्रगतीचे आणि सामाजिक चळवळीतील योगदानाचे कौतूक केले आहे. उपस्थितांचे स्वागत व्यवस्थापक रामनाथ बाळसराफ यांनी केले.

# जरांगे यांचे रखरखत्या उन्हात उपोषण

जालना (वृत्तसंस्था)

५८ लाख जणांच्या कुणबी नोंदीना प्रमाणपत्र व वैधता द्यावी, तसेच मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे आदी मागण्यांच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी झालेली बोलणी फिस्कटल्यानंतर मनोज जरांगे यांनी भर उन्हात बाज टाकून आणि डोक्यावर भगवा रुमाल गुंडाळून त्यानी उपोषणाला सुरुवात केली. परिसरातील काही मंडळी त्यांना पाठिंबा देण्यासाठी आले आहेत.

सातारा, कोल्हापूर, औंध पुणे संस्थानामधील नोंदीच्या आधारे कुणबी प्रमाणपत्राबाबतचे शासन निर्णय काढावेत, यासह विविध मागण्या केल्यानंतर सरकारकडून कोणती लेखी आश्वासने द्यायचे यावर रात्री बऱ्याच वेळ चर्चा सुरू होती. आंतरवली सराटीमध्ये चर्चा फिस्कटल्यानंतर मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड हे पुन्हा विभागीय आयुक्त कार्यालयात आले. मुख्य सचिव आणि इतर अधिकाऱ्यांबरोबर बराच वेळ खल चालला होता. एका बाजूला प्रशासकीय पातळीवर सुरू असणाऱ्या हालचालींना गती आली असताना जरांगे यांनी आंतरवली सराटीमध्ये बाज टाकून उन्हात उपोषणास सुरुवात केली आहे. दरम्यान सरकारकडून चर्चा करण्यासाठी पुन्हा राधाकृष्ण विखे पाटील आंतरवली सराटीला जाणार आहेत.

उपोषणातील मागण्यांच्या अनुषंगाने पुन्हा चर्चा करायला सरकारने यावे, असे आवाहन जरांगे यांनी उपोषणाला बसण्यापूर्वी केले होते. चर्चेतील मागण्यानुसार लेखी आश्वासनांची मागणी जरांगे यांनी केली आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या संदर्भात शासन निर्णय घेण्यात आला असला तरी प्रत्यक्षात प्रमाणपत्रे मात्र मिळत नाहीत. जी ५८ लाख कुणबी प्रमाणपत्रे दिली म्हणता त्याची यादी द्यावी, न्या. शिंदे आता गोव्याचे लोकायुक्त झालेले असल्याने समितीचे कामकाज त्यांच्याकडून होणार नाही. शिंदे समितीकडे पुरेसे मनुष्यबळ नाही.

मोडी, फारसी आणि अरबी भाषेचे तज्ज्ञ काम सोडून निघून गेले आहेत. आमच्या मागण्यांकडे लक्ष दिले जात नाही,



असा जरांगे यांचा आरोप होता. मराठा आरक्षण आंदोलनातील ६६१ पैकी ५६७ गुन्हे मागे घेण्यात आले आहेत. १९१ न्यायालयात प्रलंबित आहेत. गंभीर स्वरुपाचे ६० गुन्हे मागे घेण्याच्या संदर्भात मार्ग काढण्याचा प्रयत्न करु. असे आश्वासन राधाकृष्ण विखे यांनी या पूर्वी दिले आहे. प्रशासकीय पातळीवरील चर्चेनंतर तसेच भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केल्यानंतर सरकारचे शिष्टमंडळ पुन्हा एकदा जरांगे यांना भेटणार आहे.

सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक आहे. सरकारची भूमिका पारदर्शक आहे. आम्ही सकारात्मक काम करणारे लोक आहे. आम्ही समाजांना एकमेकांसमोर आणून भांडत नाही, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. तसेच आम्ही समाजाच्या हिताचे निर्णय घेतो.

(पान ३ वर)

## दशरथ वर्पे यांचा रविवारी कोळवाडे येथे सेवापूर्ती गौरव समारंभ सोहळा

### माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ सुधीर तांबे यांची उपस्थिती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी व गोरगरीब मुलांना गुणवत्तेचे शिक्षण देणाऱ्या जयहिंद आदिवासी आश्रम शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक दशरथ विठोबा वर्पे यांचा सेवापुर्ती सोहळा रविवार दिनांक ३१ मे २०२६ रोजी सकाळी १० वा. कोळवाडे आश्रम शाळा येथे आयोजित करण्यात आला आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर व अकोले तालुक्यातील आदिवासी व गोरगरीब बांधवांच्या मुलांना गुणवत्तेचे शिक्षण मिळावे याकरता २ ऑक्टोबर १९९४ रोजी जयहिंद आदिवासी आश्रम शाळा सुरू केली. पहिल्या दिवसापासूनच शिक्षक आणि मुख्याध्यापकाची जबाबदारी पार पाडणाऱ्या दशरथ वर्पे यांनी अत्यंत शिस्तबद्ध, नियोजन, दूरदृष्टी यावरून या शाळेला लौकिक प्राप्त करून दिला. राज्यस्तरावर या शाळेला उत्कृष्ट आदिवासी आश्रम शाळेचा पुरस्कार मिळाला आहे तर अनेक गोरगरीब मुलांचे विद्यार्थी हे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगल्या पदांवर काम करत आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांची काळजी घेणे त्याच्या नोकरी व करिअरसाठी पाठपुराव्या करण्याबरोबर दशरथ वर्पे यांनी कोळवाडे परिसरात पर्यावरण संवर्धनाचे मोठे काम केले आहे. मुख्याध्यापक दशरथ वर्पे यांच्या जीवनामध्ये नाही हा शब्द कधीच आला नाही. दंडकारण्य अभियानाचे समन्वय म्हणून ते सध्या जबाबदारी सांभाळत असून हरमन हिल वर त्यांनी सुमारे ६५ हजार विविध झाडे संवर्धन केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत कोळवाडे ग्रामस्थ व माजी विद्यार्थी यांनी त्यांचा सेवापुर्ती सोहळा घडविण्याचे नियोजित केले आहे. रविवारी महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, रणजीतसिंह देशमुख डॉ.जयश्रीताई थोरात, सुधाकर जोशी, विष्णुपंत रहाटळ, प्रा. बाबा खरात, काशिनाथ गोंदे, यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सकाळी १० वाजता त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. तरी या सेवापूर्ती सोहळ्यासाठी परिसरातील सर्व नागरिक महिला युवक व माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सर्व माजी विद्यार्थी संघटना जय हिंद आदिवासी आश्रम शाळा व कोळवाडे ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

सत्काराला फाटा-

दशरथ वर्पे हे तालुक्यातील लोकप्रिय व्यक्तिमत्व आहे त्यांच्या सेवापुर्ती निमित्त अनेकजण शाल श्रीफळ बुके घेऊन येतील तरी असे साहित्य न आणता सर्वांनी आदिवासी विद्यार्थ्यांकरता वह्या भेट आणाव्यात असे आवाहन अमृतवाहिनी बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी यांनी केले आहे.

दशरथ वर्पे सर सेवागौरव विशेषांक पान - ४, ५, ६ प्रकाशित केला आहे

# अखेर प्राजक्त तनपुरे भाजपवासी

## विधानपरिषदेसाठी तनपुरे विरूद्ध ससाणे लढत

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी राज्य मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी शरद पवार, जयंत पाटील यांची साथ सोडून अखेर आज शनिवारी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे आता अहिल्या नगर जिल्ह्यातून प्राजक्त तनपूरे हेच भाजप महायुतीचे विधानपरिषदेचे उमेदवार असतील हे नक्की आहे.

प्राजक्त तनपूरे यांनी सकाळी निवडक कार्यकर्त्यांसह मुंबई गाठली. दुपारी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत त्यांचा भाजप पक्षप्रवेश झाला. त्यानंतर त्यांना विधान परिषदेची अहिल्यानगरची उमेदवारी दिली गेली. १ जून रोजी तनपुरे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. पक्षीय बलाबल पहाता त्यांचा विजय सोपा आहे. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे करण ससाणे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे.

राहुरी विधानसभा पोटनिवडणूकवेळी भाजपच्या नेत्यांच्या सांगण्यावरून तनपुरे यांनी निवडणूक न लढता भाजपचे उमेदवार अक्षय कर्डीले यांना संधी दिली. त्यामुळे आमदार कर्डीले यांचा विजय सोपा झाला. त्यावेळीच



तनपुरे यांना विधान परिषदेचा शब्द देण्यात आला होता, अशी चर्चा होती. अखेर ती खरी ठरत आहे.

(शुक्रवारी) त्यांनी राष्ट्रवादीच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेतली होती. त्यांचा भाजप प्रवेश रोखण्यासाठी पक्षाकडून आणि त्यांच्या मामा जयंत पाटील यांच्याकडून शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न झाले, असे सांगण्यात आले. मात्र अखेर त्यांचा भाजप प्रवेश निश्चित झाला.

मी आज भाजपमध्ये प्रवेश करतोय. माझे मामा जयंत पाटीलयांना भेटायची माझ्यात हिंमत नाही. त्यांना सांगितलं देखील नाही. तसेच शरद पवार यांना देखील भेटायची हिंमत नाही. मात्र मी मतदारसंघातील अडचणी लक्षात घेऊन हा निर्णय घेतोय. ज्यांच्या जीवावर मी हा संघर्ष करत आलोय त्यांचा भावनांचा देखील मला विचार करावा लागेल. मला माझ्या कार्यकर्त्यांच राजकारण बघायच आहे. मला आता शब्द नाहीत, त्यामुळे बोलण देखील अवघड झालं आहे. अशी प्रतिक्रिया शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि सध्या भाजपच्या वाटेवर असलेले प्राजक्त तनपुरे यांनी दिली आहे.

अहिल्यानगर विधान परिषद निवडणूकीत भाजप महायुतीकडे मोठे संख्याबळ आहे. त्यामुळे येथून प्राजक्त तनपुरे यांचा विजयाचा मार्ग सुकर असल्याने तनपुरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. विरोधी महाविकास आघाडीने देखील ही निवडणूक प्रतिष्ठेची करत श्रीरामपूरचे करण ससाणे यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला आहे. करण ससाणे यांनी श्रीरामपूर नगरपरिषदेत चांगले काम केले आहे. त्यांचे वडील माजी आमदार जयंत ससाणे यांचा सर्व पक्षात चांगले संबंध होते. त्याचा फायदा करण ससाणे यांना मिळू शकतो.









# संपादकीय...

## पेपरफुटीत महाराष्ट्रातील ‘मोठे मासे’ जाळ्यात

नीट पेपरफुटी प्रकरणाने देशातील शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी आणि त्यांच्या स्वप्नांशी थेट संबंधित असलेल्या राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेचा पेपर फुटणे ही केवळ एक गुन्हेगारी घटना नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या नैतिक अध:पतनाचे भयावह चित्र आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने या प्रकरणी आतापर्यंत अनेक आरोपींना अटक केली असून त्यातील बहुसंख्य आरोपी महाराष्ट्रातील असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, या आरोपींमध्ये डॉक्टर, प्राध्यापक, क्लास चालक आणि उच्चशिक्षित व्यक्तींचा समावेश आहे. ज्यांच्याकडे समाज आदर्श म्हणून पाहतो, विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची जबाबदारी सोपवतो, त्याच लोकांनी पैशाच्या हव्यासापोटी गुणवंत विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ मांडल्याचे वास्तव अत्यंत संतापजनक आणि लाजिरवाणे आहे. लातूरमधील निवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याला या संपूर्ण रॅकेटचा मास्टरमाईंड मानले जात आहे, तर पुणे, नांदेड, नागपूर, नाशिक, अहिल्यानगर आणि इतर जिल्ह्यांशी या घोटाळ्याचे धागेदोरे जोडले गेले आहेत. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातूनच अनेक आरोपी अटक झाल्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेवर काळा डाग लागला आहे. शिक्षण ही सेवा आहे, समाजपरिवर्तनाचे साधन आहे, हा संस्कार ज्या भूमीने देशाला दिला, त्याच भूमीत शिक्षणाचे बाजारकरण आणि पेपरफुटीचे रॅकेट फोफावणे ही चिंतेची बाब आहे. नीटसारख्या परीक्षांसाठी देशभरातील विद्यार्थी दोन-दोन वर्ष रात्रंदिवस अभ्यास करतात. अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींना तोंड देत, पालकांची स्वप्ने डोळ्यांत साठवत डॉक्टर होण्याचे ध्येय उराशी बाळगतात. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी कष्ट करून स्पर्धेत टिकण्याचा प्रयत्न करतात. मात्र काही पैशाने माजलेल्या लोकांकडून प्रश्नपत्रिका विकत घेऊन पात्रता मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे खरी गुणवत्ता दुय्यम ठरत आहे. ही स्थिती केवळ अन्यायकारक नाही, तर देशाच्या भविष्यासाठी धोकादायक आहे. कारण उद्या अशा मार्गाने वैद्यकीय शिक्षणात प्रवेश मिळवणारे विद्यार्थीच रुग्णांच्या जीवाशी खेळणार असतील, तर समाजाचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास कसा टिकणार? नीट पेपरफुटी ही काही पहिली घटना नाही. मागील अनेक वर्षांत विविध भरती परीक्षा, स्पर्धा परीक्षा आणि प्रवेश परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटना सातत्याने समोर आल्या आहेत. प्रत्येक वेळी तपास, अटक, चौकशी आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप यांचा गाजावाजा होतो; मात्र काही काळानंतर प्रकरण थंडावते आणि दोषींना कठोर शिक्षा होत नाही. यामुळेच गुन्हेगारांच्या मनातील भीती संपली आहे. पैशाच्या आणि राजकीय संपर्कांच्या जोरावर आपण सहज सुटू शकतो, अशी मानसिकता वाढत चालली आहे. ही मानसिकता मोडून काढण्यासाठी केवळ अटक पुरेशी नाही, तर जलदगती न्यायालयात खटले चालवून दोषींना कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार हा सामान्य भ्रष्टाचारापेक्षा अधिक घातक असतो, कारण तो थेट देशाच्या बौद्धिक आणि नैतिक पायावर आघात करतो. केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा एजन्सी या दोघांचीही या प्रकरणात जबाबदारी नाकारता येणार नाही. प्रश्नपत्रिका सुरक्षेच्या नावाखाली अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात असल्याचे सांगितले जाते, परंतु तरीही पेपर फुटत असतील तर व्यवस्थेतील छिद्रे किती मोठी आहेत, हे स्पष्ट होते. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या प्रकरणी दिलगिरी व्यक्त केली असली, तरी केवळ दिलगिरी पुरेशी नाही. विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा परीक्षांवरील विश्वास पुन्हा निर्माण करायचा असेल, तर पारदर्शक आणि कठोर कारवाई अपरिहार्य आहे. राज्य सरकारनेही या प्रकरणाकडे केवळ कायदेशीर गुन्हा म्हणून न पाहता सामाजिक संकट म्हणून पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि शैक्षणिक दृष्ट्या पुढारलेल्या राज्याचे नाव अशा घोटाळ्यांमध्ये पुढे येणे ही गंभीर बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात विशेष लक्ष घालून राज्यातील कोचिंग क्लासेस, परीक्षा केंद्रे आणि शिक्षण संस्थांच्या कार्यपद्धतीची व्यापक चौकशी करण्याची आवश्यकता आहे. शिक्षण व्यवस्थेतील प्रामाणिकपणा टिकवायचा असेल, तर केवळ कायदे करून चालणार नाही, तर नैतिकता आणि उत्तरदायित्व यांची संस्कृती निर्माण करावी लागेल. अन्यथा गुणवंत विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची हत्या करणाऱ्या अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील.

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अकोले, ता. अकोले जि. अहिल्यानगर**

EQJ COURT CASE NO. ०००५७/२०२६

१. राहीबाई भिकाजी वाल्हेकर रा. ठाकरवाडी (लिंगदेव), ता. अकोले, जि. अहिल्यानगर

**विरुध्द**

१. लहानबाई बाळासाहेब कानवडे
२. चहाबाई यशवंत काळे
३. सोन्याबाई विश्वनाथ धुमाळ
४. सारजाबाई भाऊसाहेब गोडसे
५. निवृत्ती उमाजी कोल्हाळ
६. रामदास निवृत्ती शिंदे
७. मंगल कैलास कोल्हाळ


वरील सर्व रा. ठाकरवाडी (लिंगदेव), ता. अकोले, जि. अहिल्यानगर

या नोटीसीव्दारे कळविणेत येते की, अर्जदार राहीबाई भिकाजी वाल्हेकर रा. ठाकरवाडी (लिंगदेव), ता. अकोले, यांनी मौजे लिंगदेव येथील स.न ९/४ ते ९८ (जुना ४७/अ) या हस्तलिखीत ७/१२ प्रमाणे दुरुस्ती होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदार यांनी सादर केलेल्या सदर अर्जाबाबत दिनांक. १६/०६/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले यथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. आपणाकडे उपलब्ध कागदपत्रासह सदर दिनांकास आपण उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत आपले काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/०५/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार अकोले तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी अकोले, जिल्हा – अहिल्यानगर**





**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०

We treat He cure's
**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**भाड्याने देणे आहे**
संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क - 9822258458









**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकान कामासाठी मुले पाहिजेत
इंग्रजीचे ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार
संपर्क- ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
9730042410

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
PULAVAR VEGANESHWARAN
TO NEW NAME AS
VIGNESHWARAN
BY AFFIDAVIT NO - 328/2026
DATE 29/05/2026
ADD- 90 FEET ROAD,10/S-11, TRANSIST CAMP, RAJIV GANDHI NAGAR, DHARAVI, MUMBAI 400017, MAHARASHTRA

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

दैनिक
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०



# भोंदू गडगेला जामीन मंजूर

## डॉ. मोहन पुरीसह तिघे अद्यापही फरार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- विविध गंभीर कलमांसह जादूटोणा विरोधी कायदा आणि आक्षेपार्ह जाहिरात प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असलेल्या आरोपीचा नियमित जामीन अर्ज संगमनेर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण सुनावणीदरम्यान मंजूर केला आहे. राजेंद्र बापू गडगे (वय ५३ वर्षे) असे जामीन मंजूर झालेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी राजेंद्र गडगे याच्याविरुद्ध संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हे दाखल आहेत.

याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपीने नियमित जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. सदर नियमित जामीन अर्जावर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मंदार नेरलेकर यांच्या न्यायालयात सुनावणी दरम्यान बचाव पक्षाचे वकील ॲड. श्रीप्रसाद कानडे यांनी गडगेच्यावतीने जोरदार युक्तिवाद केला. या प्रकरणात मुख्य युक्तिवाद करण्यासाठी राजेंद्र गडगे बाबा यांच्यावतीने वरिष्ठ विधीज्ञ ॲड. सुनिता बन्सल, ॲड. श्रीप्रसाद कानडे, ॲड. मंगेश टेकावडे आणि ॲड. नितीश चोरबोले यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. संपत पवार आणि ॲड. स्वाती सांगळे यांनी सहकार्य केले. बचाव पक्षाच्या वकिलांनी कायद्यातील विविध तरतुदी, दाखल गुन्ह्यांचे स्वरूप आणि सादर केलेले पुरावे याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे विचारात घेऊन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मंदार नेरलेकर यांनी आरोपी राजेंद्र गडगे यांचा नियमित जामीन मंजूर करताना संशयित आरोपीला ६० हजार रुपयांचे वैयक्तिक बंधपत्र आणि तेवढ्याच रकमेचा एक किंवा दोन जामीनदार सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच गुन्ह्यातील फिर्यादी किंवा साक्षीदारांपैकी कोणत्याही प्रकारचा संपर्क साधू नये, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणू नये किंवा त्यांना धमकावू नये, अशी सक्त ताकीद न्यायालयाने आरोपीला दिली. तब्बल ४२ दिवसांनी गडगे बाबा याला जामीन मिळाल्याबद्दल अंधश्रद्धा निर्मुल समितीच्या राज्य सचिव ॲड. रंजना गवांदे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र येत्या काही दिवसांत गडगेविरुद्ध आणखी गंभीर गुन्हे दाखल होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.



**या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार मानला जाणारा डॉ. मोहन पुरी हा गुन्हा दाखल झाल्यापासून अद्याप फरार आहे. राजेंद्र गडगे याने भाविकांची फसवणूक करून गोळा केलेल्या अफाट संपत्तीच्या आणि आर्थिक व्यवहारांचा तपास पोलिसांनी अद्याप केलेला नाही. अशा गंभीर आणि सामाजिक स्वरूपाच्या गुन्ह्यात तपास पूर्ण होण्याआधीच आरोपीला जामीन मिळणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.**

**ॲड. रंजना गवांदे**
**राज्य सचिव, अंधश्रद्धा निर्मूलन समिती**

# कांद्याला तीन हजार रूपये भाव द्या किसान सभेचे अकोलेत आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - कांद्याला किमान ३००० रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा, कमी दरात कांदा विकलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान द्यावे व हा निर्णय संपूर्ण राज्यभर लागू करावा, या मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने अकोले तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारात कांदे ओतून सरकारच्या धोरणांचा निषेध केला.




सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. राज्यभर बाजारात कांद्याला अत्यंत कमी दर मिळत आहेत. अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर उत्पादन खर्चापेक्षाही खाली गेले असून वाहतूक, मजुरी, साठवणूक आणि शेती खर्च वजा जाता शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरत नाही. अवकाळी पाऊस, हवामानातील बदल आणि वाढते इनपुट खर्च यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना बाजारातील पडलेल्या दरांचा दुहेरी फटका बसत आहे. केंद्र सरकारकडून वेळोवेळी लादण्यात येणारी निर्यात बंदी, अपुरी साठवणूक व्यवस्था आणि बाजार हस्तक्षेपाचा अभाव यामुळे कांदा उत्पादकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

अखिल भारतीय किसान सभेचे महाराष्ट्र राज्य सचिव डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यामध्ये किसान सभेचे सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, एकनाथ मेंगाळ, राजाराम गंभीरे, तुळशीराम कातोरे, ज्ञानेश्वर काकड, संगीता साळवे, हेमलता शेळके, दत्ता गोंदके, बाळासाहेब भोर, अजित चौधरी, दत्ता कोंडार , योगेश भरितकर, बाळासाहेब मधे, आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

आंदोलनापूर्वी अकोले शहरातून जोरदार मिरवणूक काढण्यात आली. घोषणाबाजी करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यात आले.

केरळचे विरोधीपक्ष नेते व माजी मुख्यमंत्री पिणरई विजयन यांचा घरावर राजकीय सूडबुद्धीने ईडीची धाड टाकली गेल्या. याबाबत केंद्र सरकारचा यावेळी धिक्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आंदोलनकर्त्यांनी सरकारवर शेतकरीविरोधी धोरणे राबविल्याचे मत व्यक्त केले. वारंवार लादण्यात येणाऱ्या कांदा निर्यात बंदीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे वक्त्यांनी सांगितले. तसेच कांद्याची साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याने हा प्रश्न अधिक गंभीर झाला असल्याचे सांगण्यात आले.

कांद्याच्या प्रश्नावर दीर्घकालीन धोरण आखून साठवणूक क्षमता वाढवावी, निर्यात बंदीऐवजी निर्यात प्रोत्साहनाचे धोरण स्वीकारावे आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण द्यावे, अशा मागण्याही आंदोलनादरम्यान करण्यात आल्या.

# यूपी-बिहारमध्ये वादळी पावसाचे ४८ बळी

लखनौ (वृत्तसंस्था)

देशात उष्णतेच्या लाटेदरम्यान १५ राज्यांमध्ये पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. बिहारमध्ये गेल्या २४ तासांत वादळी पाऊस आणि वीज कोसळल्याने १७ लोकांचा मृत्यू झाला आहे. पाटण्यात पावसामुळे ४ विमाने वळवण्यात आली, तर १८ विमानांना उशीर झाला. यामुळे सुमारे ५०० हून अधिक प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागला.

उत्तर प्रदेशात गेल्या २४ तासांत वादळी वाऱ्यामुळे ३१ लोकांचा मृत्यू झाला आहे. सहारनपूरमध्ये मुसळधार पावसानंतर डोंगरावरून वेगाने पाणी खाली आले. यामुळे इनोव्हा-ट्रॅक्टरसह १० वाहने वाहून गेली.

राजस्थानमध्ये शनिवारी ३० जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता आहे. एक दिवसापूर्वी चुरू, हनुमानगड, बिकानेर, सीकरसह ९ जिल्ह्यांमध्ये तापमान १० अंशांपर्यंत खाली आले.दरम्यान, भारतीय हवामान विभागाने सांगितले आहे की नैऋत्य मान्सून पुढील ७ दिवसांत केरळमध्ये दाखल होऊ शकतो. मात्र, विभागाने यावर्षी मान्सून सामान्यपेक्षा कमकुवत राहण्याचा अंदाजही वर्तवला आहे.

आयएमडीनुसार, जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. यावेळी मान्सूनचा पाऊस दीर्घकालीन सरासरी च्या सुमारे ९०% राहण्याची शक्यता आहे. देशात सामान्य मान्सून पावसाची सरासरी ८७ सेंटीमीटर मानली जाते.

## एआयमध्ये भारत चौथ्या स्थानी

मुंबई (वृत्तसंस्था)

- इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्सने शुक्रवारी इंडियाज डिजिटल इकॉनॉमी २०२६ अहवालानुसार, भारत पाचवी सर्वात जास्त डिजिटलाइज्ड अर्थव्यवस्था बनला आहे. २०२५ मध्ये तो आठव्या स्थानावर होता. तर देश एआय कामगिरीच्या बाबतीत चिप्स-एआय इंडेक्समध्ये अमेरिका, चीन आणि सिंगापूरनंतर चौथ्या स्थानावर आहे. ही वाढ डिजिटल कनेक्टिव्हिटी, फिनटेक विकास आणि नवोपक्रम क्षमतेतील सुधारणेचा परिणाम आहे. जगाच्या जीडीपीच्या ९६% भाग व्यापणाऱ्या ७१ देशांमध्ये केलेल्या अभ्यासातून असे दिसून येते की भारत डिजिटल कामगिरीमध्ये जर्मनी, फ्रान्स, जपान आणि कॅनडासह प्रमुख विकसित अर्थव्यवस्थांना मागे टाकत आहे.

# एमपीएससीची संयुक्त पूर्व परीक्षा रविवारी

## जिल्ह्यातील १५ उपकेंद्रांभोवती प्रतिबंधात्मक आदेश

जिल्हा माहिती कार्यालयाकडून -

अहिल्यानगर- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित 'महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६' रविवार, दि. ३१ मे रोजी सकाळी १० ते दुपारी १२ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत जिल्ह्यातील १५ परीक्षा उपकेंद्रांवर होणार आहे. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी आयोगाचे केंद्रप्रमुख तथा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी परीक्षा उपकेंद्रांच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (बीएनएसएस) च्या कलम १६३ (३) अंतर्गत सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.



या परीक्षेसाठी अहिल्यानगर जिल्हा केंद्रावर एकूण ५ हजार ३७३ उमेदवार प्रविष्ट झाले आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी ३ समन्वय अधिकारी (वर्ग-१ उपजिल्हाधिकारी संवर्ग), १ भरारी पथक अधिकारी, १५ उपकेंद्रप्रमुख, ५३ पर्यवेक्षक, २४६ समवेक्षक, ४ सहायक, ३० लिपिक, १५ केअरटेकर, १५ बेलमन, १५ शिपाई, ५३ पाणीवाटप कर्मचारी आणि २० वाहनचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे. उमेदवारांना परीक्षा केंद्रावर सकाळी ९.३० वाजल्यापासून प्रवेश दिला जाणार आहे. परीक्षेतील उत्तरे लिहिण्यासाठी केवळ काळ्या शाईचे बॉलपॉइंट पेन वापरणे आवश्यक असून आयोगाने दिलेल्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मोबाईल, कॅल्क्युलेटर, डिजिटल डायरी, पेजर, मायक्रोफोन आदी दूरसंचार साधने परीक्षा केंद्र परिसरात किंवा परीक्षा दालनात आणण्यास तसेच स्वतःजवळ बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरून स्वतः डाउनलोड करून घ्यावीत. दुय्यम प्रवेशपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिली जाणार नसल्याची नोंद उमेदवारांनी घ्यावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी परीक्षा उपकेंद्रांच्या १०० मीटर परिसरातील एसटीडी बुथ, फॅक्स व झेरॉक्स दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# जरांगे यांचे रखरखत्या...

पान १ वरून- परंतु त्याचवेळी संविधान आणि न्यायलयाच्या निर्णयाच्या आधिन राहून निर्णय घेतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.एका समाजाचं आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला द्यायचा असं कधीही केलं नाही, ओबीसी समाजालाही घाबरण्याची आवश्यकता नाही. मराठा समाजाचाही त्या ठिकाणी समाधान करून देण्याकरिता सगळे निर्णय घेऊपरंतु ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही. आता चर्चा झालेली आहे पुन्हा एकदा सांगतो न्यायालय, कायदा आणि संविधान याच्या चौकटीत बसून कोणताही निर्णय घेण्यास तयार आहोत, असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केले.

# मृत व्यक्तीची ओळख पटली



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील जोर्वे गाव परिसरात मंगळवारी (दि. २७) सकाळी सुमारे ७ वाजेच्या सुमारास एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. पोलिसांनी केलेल्या तपासानंतर संबंधित व्यक्तीची ओळख पटले असून त्यांचे नाव शब्बीर जमादार मन्सुरी (वय ४७, रा. सोनगाव, ता. राहुरी) असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्राथमिक माहितीनुसार त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे तालुका पोलिसांनी सांगितले. मृतदेह आढळल्यानंतर नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली होती. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून आवश्यक कार्यवाही केली. या घटनेची नोंद तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# तुकाराम मुंढेंचा पतंजलीला दे धक्का

## राज्यभरात ७३ लाखांचा औषधसाठा जप्त

मुंबई (वृत्तसंस्था)

अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभरातील भेसळयुक्त, मिसब्रँडेड आणि भ्रामक जाहिरातींच्या माध्यमातून विक्री होणाऱ्या औषधांविरोधात मोठी मोहीम उघडली आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यातील सात जिल्ह्यांमधील १२ आयुर्वेदिक औषध विक्री आस्थापनांवर धडक कारवाई करण्यात आली असून तब्बल ७३ लाख २४ हजार ६५६ रुपयांचा औषधसाठा जप्त करण्यात आला आहे.



एफडीएच्या पथकांनी केलेल्या तपासणीत हरिद्वार येथील दिव्या फार्मसी या उत्पादक कंपनीच्या विविध औषधांचा मोठा साठा आढळून आला. संबंधित औषधांच्या जाहिरातींमध्ये आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणारे दावे करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. याप्रकरणी औषधे व जादूटोणाविरोधी (आक्षेपार्ह जाहिराती) कायदा १९५४ तसेच औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा १९४० अंतर्गत कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या कारवाईनंतर आयुक्त तुकाराम मुंढे यांनी जनतेच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांना स्पष्ट इशारा दिला आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा आस्थापनेला प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. भ्रामक जाहिराती, अवैध उत्पादन आणि नियमबाह्य औषध विक्रीविरोधातील कारवाई यापुढे अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील विविध विभागांमध्ये करण्यात आलेल्या कारवाईत कोकण विभागात सर्वाधिक १८ लाख ५८ हजार रुपयांचा औषधसाठा जप्त करण्यात आला. पुणे विभागात १४ लाख ६८ हजार रुपयांचा, नागपूरमध्ये ७ लाख २६ हजार रुपयांचा, नाशिकमध्ये ७ लाख १० हजार रुपयांचा, बृहन्मुंबईत १ लाख ८५ हजार रुपयांचा, अमरावतीत १ लाख ४२ हजार रुपयांचा तर छत्रपती संभाजीनगर विभागात ४८ हजार ७१८ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. याशिवाय पुणे विभागात मिसब्रँडेड एलोपथी औषधांचा तब्बल २१ लाख ८३ हजार रुपयांचा साठाही जप्त करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली.

दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही औषधांच्या भ्रामक जाहिरातींवर विश्वास ठेवू नये तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधांचे सेवन करू नये, असे आवाहन एफडीएने केले आहे. स्वतःहून औषधोपचार केल्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे संशयास्पद औषधे किंवा उत्पादनांची माहिती तातडीने प्रशासनाला द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# पारेगाव बुद्रुक पालखी मार्ग दुरुस्ती कामास सुरुवात

## आ. खताळांच्या सूचनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाची तीव्र कार्यवाही



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पारेगाव बुद्रुक येथील रस्ता व पालखी मार्गाच्या दुरुस्तीच्या कामास आमदार अमोल खताळ यांच्या सूचनेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे, अशी माहिती महायुतीचे पदाधिकारी सुरेश दळवी आणि किशोर गडाख यांनी दिली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर पालखी सोहळ्याचे सिन्नर तालुक्यातून संगमनेर तालुक्यात आगमन होणार आहे. या पार्श्वभूमीवर पारेगाव बुद्रुक, काकडवाडी परिसरातील पालखी मार्ग मोठ्या प्रमाणात नादुरुस्त झाला होता. पालखी सोहळ्यादरम्यान या मार्गावर वारकरी भाविकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र, रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरिकांसह वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी महायुतीचे सुरेश दळवी आणि किशोर गडाख यांनी आमदार खताळ यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेत आमदार खताळ यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना त्वरित काम सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ कार्यवाही करत पालखी मार्गाच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी आमदार अमोल खताळ तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे आभार व्यक्त केले आहेत.

# सेवाव्रती दशरथ विठोबा वर्पे सर



## रचनात्मक कार्यातील सेवाव्रती

**– बाळासाहेब थोरात**
**माजी महसूलमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई**



कोळवाडे या आदिवासी बहुल भागात आश्रमशाळा सुरू करण्याचा माझा आधीपासूनच मानस होता. आदिवासी समाजातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यावेळी 'आदिवासी आश्रमशाळा' हे सर्वात प्रभावी माध्यम होते. याच उद्देशाने २ ऑक्टोबर १९९४ रोजी मी आणि डॉ. सुधीर तांबे यांनी कोळवाडे (ता. संगमनेर) येथील मारुती मंदिरात नारळ वाढवून आश्रमशाळा सुरू करत असल्याची घोषणा केली. त्यावेळी गावकऱ्यांशी संवाद साधताना मी त्यांना एकच आवाहन केले की, ही शाळा जर आपल्याला खऱ्या अर्थाने यशस्वीरीत्या चालवायची असेल, तर जबाबदारी घेणारा एखादा होतकरू आणि तळमळीचा तरुण सुचवा. गावकऱ्यांनी मला दशरथ विठोबा वर्पे या तरुणाचे नाव सुचवले.

दुसऱ्याच दिवशी, ३ ऑक्टोबरला सकाळी सहा वाजता श्री. काशिनाथ गोंदे, दादाभाऊ वर्पे आणि भाऊसाहेब नवले हे दशरथ वर्पे या तरुणाला घेऊन माझ्याकडे आले. मी वर्पे यांना कामाच्या स्वरूपाबद्दल अनेक प्रश्न विचारले. त्यांनी दिलेली उत्तरे, त्यांची कामाची समज आणि तत्परता पाहून हा माणूस या आश्रमशाळेच्या कामासाठी अत्यंत योग्य असल्याची माझी खात्री पटली. मी त्यांना तत्काळ आश्रमशाळेत नियुक्ती दिली आणि म्हणालो, मी कालच नारळ वाढवून आलो आहे. आता आपल्याला काहीही झालं तरी शाळा सुरू करायचीच आहे. यासाठी जी मदत लागेल ती माझ्याकडून घ्या, डॉक्टर तांबे यांच्याशी बोला, कामाला लागा. वर्पे यांनी यापूर्वी एका शाळेत नोकरी केली होती, त्यामुळे माझ्या त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत, हे त्यांनी चटकन ओळखले.

त्यानंतर खऱ्या अर्थाने कामाला सुरुवात झाली. सुरुवातीला गावकऱ्यांच्याच रिकाम्या घरांमध्ये शाळा भरू लागली. सावरचोळ येथे बंद पडलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा शोध घेऊन पहिली ते चौथीचे वर्ग सुरू करण्याच्या सूचना मी दिल्या होत्या. त्या काळात आश्रमशाळा उभी करणे आणि चालवणे हे मोठे जिकिरीचे काम होते. तीर्थरूप भाऊसाहेब थोरात यांचेही या शाळेकडे नेहमी बारकाईने लक्ष असायचे. शाळेची घडी बसेपर्यंत मी, डॉ. तांबे आणि काही हितचिंतकांनी शाळेला भक्कम आर्थिक मदत करण्याची भूमिका घेतली. मला आजही तो प्रसंग आठवतो; काही वर्ग खोल्यांची डागडुजी करणे आवश्यक होते. काही शैक्षणिक साहित्य घ्यायचे होते. वर्पे सर मला भेटले, त्यांनी अडचण बोलून दाखवली. ट्रॅक्टरमध्ये गव्हाची २५ पोती भरून दिली आणि म्हणालो हे मार्केटमध्ये विका आणि मिळणाऱ्या पैशातून शाळेला ज्या वस्तू लागतील त्या घ्या. येणाऱ्या अडचणी आणि त्यातून मिळणारा अनुभव याचा आम्ही आनंदाने स्वीकार करत होतो. त्याच वर्षी गावकऱ्यांच्या सहकार्याने १३० मुलांनिशी पहिली ते चौथीचे वर्ग सुरू झाले. पहिल्याच वर्षी या आश्रमशाळेतील एका विद्यार्थिनीने चौथीच्या परीक्षेत पिंपरणे केंद्रात पहिला क्रमांक पटकावला. आश्रम शाळा सुरू करण्याचा आमचा उद्देश बरोबर होता याची खात्री पटली. सुरुवातीला ग्रामपंचायतीच्या खोलीत आणि लोकांच्या घरांत भरणारी ही शाळा दशरथ वर्पे यांच्या परिश्रमामुळे नावारूपाला आली. १९९८ साली शाळेसाठी हक्काची जागा उपलब्ध झाली. २००० साली पत्र्यांची सुसज्ज इमारत उभी राहिली आणि २००२ मध्ये विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू झाले. पाहता पाहता २००५ मध्ये शाळेची एक दिमाखदार इमारत उभी राहिली. तत्कालीन मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या उपस्थितीत आम्ही या इमारतीचे लोकार्पण केले.

> **कोळवाडेच्या दुर्गम आदिवासी भागात शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी सुरू झालेल्या जयहिंद आश्रमशाळेच्या उभारणीत दशरथ वर्पे यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले. मर्यादित साधने, असंख्य अडचणी आणि संघर्षमय परिस्थितीत त्यांनी जिद्द, नियोजन आणि समर्पणाच्या बळावर एका छोट्या उपक्रमाचे राज्यातील आदर्श आश्रमशाळेत रूपांतर केले. तीन दशकांहून अधिक काळ आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वाहिलेल्या त्यांच्या सेवेमुळे हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त होत असताना त्यांच्या कार्याचा गौरव हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून शिक्षणसेवेच्या अखंड साधनेचा गौरव आहे.**
>
> **जिद्द,समर्पण आणि शिक्षणसेवेचा प्रेरणादायी प्रवास**

या आश्रम शाळेच्या प्रगतीत दशरथ वर्पे यांची चिकाटी, सातत्यपूर्ण प्रयत्न मोलाचे ठरले. त्यांनी 'जयहिंद आश्रमशाळेची' केवळ घडीच बसवली नाही, तर तिला उत्तम शैक्षणिक दर्जाही प्राप्त करून दिला. त्यांच्या याच परिश्रमाची पावती म्हणून राज्य सरकारने या शाळेचा 'राज्यातील सर्वोत्कृष्ट आश्रमशाळा' म्हणून गौरवही केलेला आहे. या आश्रम शाळेचे हजारो विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. गेली ३२ वर्षे दशरथ वर्पे एका व्रतस्थाप्रमाणे आदिवासी मुलांची सेवा करत आहेत, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहेत.

केवळ आश्रमशाळेची जबाबदारी समर्थपणे पेलून ते थांबले नाहीत, तर त्यांनी 'एसएमबीटी' (SMBT) सेवाभावी संस्थेच्या कामातही मोलाचा हातभार लावला. त्यांच्यात असलेली तीक्ष्ण बुद्धिमत्ता, नियोजनाचे उपजत ज्ञान, कामाची दूरदृष्टी आणि उत्तम पाठपुराव्याची क्षमता यामुळेच ते आज एसएमबीटी कुटुंबाचा एक अविभाज्य भाग बनले आहेत.

एखादे रचनात्मक काम हाती घेतले की ते काम तडीस नेण्याची एक अनोखी हातोटी दशरथ वर्पे यांच्याकडे आहे. त्यांच्या याच अतुलनीय योगदानामुळे आणि निःस्वार्थ सेवेमुळे त्यांच्या कामाचा ठसा कायमस्वरूपी कोरला गेला आहे. आज ते मुख्याध्यापक पदावरून लौकिक अर्थाने सेवानिवृत्त होत असले, तरी त्यांचे काम नेहमीच पुढे सुरु राहणार आहे. श्री. दशरथ वर्पे यांनी आता 'सर्वांचे वर्पे सर' हा लौकिक प्राप्त केला आहे. त्यांच्या निरोगी आणि सुखमय वाटचालीस माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

## डोंगरदऱ्यांत ज्ञानदीप लावणारे लोकशिक्षक

### जयहिंद आदीवासी आश्रमशाळा, कोळवाडेचे मुख्याध्यापक दशरथ वर्पे

**– डॉ. सुधीर तांबे**
**माजी आमदार, विधान परिषद, मुंबई**

शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. विशेषतः आदिवासी, दुर्गम आणि वंचित समाजघटकांच्या जीवनात शिक्षणामुळेच नवे क्षितिज उघडते. हीच दूरदृष्टी डोळ्यांसमोर ठेवून थोर स्वातंत्र्यसैनिक व सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी डोंगरदऱ्यांत राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या कोळवाडे या निसर्गरम्य गावात जयहिंद आदिवासी आश्रम शाळेची स्थापना केली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले आणि संगमनेर हे दोन्ही तालुके डोंगरी व दुर्गम भागात मोडतात. अकोले तालुक्यात आदिवासी समाजाची मोठी वस्ती असून संगमनेर तालुक्यातील काही गावांमध्येही आदिवासी बांधव मोठ्या संख्येने राहतात. पर्जन्यछायेच्या प्रदेशामुळे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या या समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण हाच खरा मार्ग असल्याची जाणीव ठेवून एसएमबीटी सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून २ ऑक्टोबर १९९४ रोजी कोळवाडे येथे आदिवासी आश्रम शाळा सुरू करण्यात आली.

या शाळेच्या स्थापनेपासूनच शिक्षक आणि मुख्याध्यापक अशी दुहेरी जबाबदारी अत्यंत समर्पित भावनेने सांभाळणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे दशरथ वर्पे सर. शेतकरी कुटुंबात वाढलेल्या वर्पे सरांना लहानपणापासूनच कष्ट, प्रामाणिकपणा आणि जिद्दीचे संस्कार लाभले. स्वतःचे शिक्षणही त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पूर्ण केले. त्यामुळे गरिबी, संघर्ष आणि शिक्षणाचे महत्त्व याची त्यांना खरी जाणीव होती. लोकनेते ना. बाळासाहेब थोरात, फादर हर्मन बाखर यांच्यासारख्या समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वांच्या सहवासातून त्यांना समाजकार्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी कोळवाडे आदिवासी आश्रम शाळेलाच आपल्या जीवनाचे ध्येय मानले. दिवस-रात्र काम करण्याची तयारी, सातत्य, प्रामाणिकपणा, विद्यार्थ्यांप्रति आत्मीयता आणि प्रशासनाशी समन्वय राखण्याची हातोटी या गुणांमुळे वर्पे सरांच्या नेतृत्वाखाली शाळेची प्रगती वेगाने होत गेली.

एसएमबीटी संस्थेने शाळेसाठी भव्य इमारत, क्रीडांगण आणि विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. ग्रामस्थांचे सहकार्य, शिक्षकांचे समर्पित प्रयत्न आणि वर्पे सरांचे नेतृत्व यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सातत्याने वाढ झाली. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला. उपक्रमशीलता, नावीन्यपूर्ण शिक्षणपद्धती आणि संस्कारमूल्यांमुळे या शाळेतील अनेक विद्यार्थी आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आहेत. या कार्याची दखल घेत राज्यस्तरीय आदर्श आदिवासी आश्रम शाळा म्हणून शाळेला गौरव प्राप्त झाला आहे.

शिक्षण क्षेत्रापुरतेच नव्हे तर ग्रामीण विकास आणि पर्यावरण संवर्धनातही वर्पे सरांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात आणि फादर हार्मन बाखर यांच्या प्रेरणेतून त्यांनी जलसंधारण, वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षणाची मोठी चळवळ उभारली. एकेकाळी दुष्काळी असलेला कोळवाडे परिसर आज हिरवाईने नटलेला दिसतो, त्यामागे या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा मोठा वाटा आहे.

फादर रॉबर्ट डिकोस्टा यांच्या सहकार्याने वन विभाग आणि एसएमबीटी सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ३ लाख रोपांची नर्सरी उभारण्यात आली. गावातील मंदिरे, सभागृहे, समाजमंदिरे तसेच गरजू नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठीही त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला. जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या दंडकारण्य अभियानाचे समन्वयक म्हणून त्यांनी प्रभावी नेतृत्व केले आहे. कोळवाडे परिसरात सुमारे ६५ हजार वृक्षांची हार्मन हिल उभारणे हे त्यांच्या पर्यावरणप्रेमाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. सप्तशृंगी गड मंदिर परिसर, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील वेळुंजे, सिन्नर तालुक्यातील ठाणगांव, मान-खटाव तालुक्यातील बनगरवाडी तसेच संगमनेर तालुक्यातील विविध डोंगरभागांमध्ये वृक्षारोपण आणि संवर्धनाची मोठी चळवळ त्यांनी उभी केली.

सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असतानाही वर्पे सर आजही समाजकार्य, वृक्षसंवर्धन आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये तितक्याच उत्साहाने कार्यरत आहेत. 'नाही' हा शब्दच त्यांच्या जीवनात नाही. कोणत्याच कामाला ते कधीही नाही म्हटले नाही, सतत हसतमुख राहून काम करणारे आणि प्रत्येक उपक्रमात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे लोकशिक्षक म्हणून त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. कुटुंब, शेती आणि समाजकार्य यांचा सुंदर समतोल राखत त्यांनी आपल्या परिवारालाही संस्कारमय आणि प्रगतिशील बनवले. कोळवाडे परिसरातील सामाजिक बांधिलकी जपणारे आणि गरजूंना सतत मदतीचा हात देणारे कुटुंब म्हणून वर्पे परिवाराने मोठा लौकिक मिळवला आहे.

सेवानिवृत्ती हा प्रत्येकाच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. मुख्याध्यापक पदावरून ते निवृत्त होत असले तरी त्यांचे कार्य, विचार आणि मार्गदर्शन जयहिंद आदिवासी आश्रम शाळेला कायम प्रेरणा देत राहील. सतत उत्साही, रचनात्मक कार्यात रमणारे आणि शिक्षण व पर्यावरण या दोन्ही क्षेत्रांत आयुष्य वाहून घेणारे आदरणीय दशरथ वर्पे सर यांना निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



> **जयहिंद आदिवासी आश्रम शाळेच्या स्थापनेपासून आजवरचा प्रवास हा केवळ एका शैक्षणिक संस्थेच्या प्रगतीचा इतिहास नाही, तर शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धन यांच्या संगमातून घडलेल्या परिवर्तनाची प्रेरणादायी गाथा आहे. दशरथ वर्पे सर यांनी तीन दशकांहून अधिक काळ आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी, ग्रामीण विकासासाठी आणि हरित चळवळीच्या विस्तारासाठी निःस्वार्थपणे कार्य केले. त्यांच्या नेतृत्वातून हजारो विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली, तर दुर्गम भागात विकास आणि पर्यावरण संवर्धनाचा आदर्श निर्माण झाला. सेवानिवृत्ती हा त्यांच्या सेवाकार्याचा शेवट नसून समाजप्रबोधनाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे.**
>
> **आदिवासी विकासाचा ध्यास जपणारा लोकशिक्षक**

# सेवापूर्ती गौरव समारंभ विशेषांक









सरांनी शिक्षणाची ज्योत पेटवली, तर पत्नी मंगलताईंनी त्या ज्योतीची वात बनून तिला अखंड तेवत ठेवले

## दशरथ विठोबा वर्पे : जीवनपट

- जन्म : १ जून १९६९, कोळवाडे (ता. संगमनेर)
- पालक : विठोबा नामदेव वर्पे व स्व. विमलबाई विठोबा वर्पे
- प्राथमिक शिक्षण : जिल्हा परिषद प्राथ. शाळा, कोळवाडे
- माध्यमिक शिक्षण : मल्हारराव होळकर विद्यालय, अंभोरे
- उच्च माध्यमिक शिक्षण : पेटीट ज्युनिअर कॉलेज, संगमनेर
- बारावीमध्ये पेटीट विद्यालयात प्रथम क्रमांकाने यश
- पदवी शिक्षण : बी.कॉम., संगमनेर महाविद्यालय (१९९०)
- पदव्युत्तर शिक्षण : एम.कॉम., संगमनेर महाविद्यालय (९२)
- व्यावसायिक शिक्षण : बी.एड., गोखले एज्यु. सोसायटी, संगमनेर (१९९४)
- बालपणापासून प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष; मजुरी, गवंडीकाम व इतर श्रमप्रधान कामांचा अनुभव
- शिक्षणासाठी एस. के. लोहे ग्रंथालयात कार्यरत राहून स्वावलंबी वाटचाल
- विवाह : १८ एप्रिल १९९२ रोजी सौ. मंगलताई (माहेर – खांडगाव) यांच्याशी विवाह
- प्रारंभीची नोकरी : शारदा विद्यालय, संगमनेर येथे लिपिक
- अध्यापन क्षेत्रातील प्रारंभ : गगनगिरी विद्यालय, पिंपरणे येथे शिक्षक
- २ ऑक्टोबर १९९४ रोजी जयहिंद आदिवासी आश्रम शाळेच्या स्थापनेपासून मुख्याध्यापक म्हणून कार्यारंभ
- दुर्गम आदिवासी भागातील आश्रमशाळेची उभारणी, विस्तार व गुणवत्तावृद्धीसाठी ३२ वर्षांची अखंड सेवा
- शाळेच्या विकासासाठी विद्यार्थी संख्या, वसतिगृह, इमारत, शैक्षणिक सुविधा व प्रशासकीय मान्यता मिळविण्यात मोलाची भूमिका
- जयहिंद आदिवासी आश्रम शाळेला राज्यस्तरीय आदर्श आश्रमशाळेचा बहुमान मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान
- हजारो आदिवासी व ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य
- अनेक गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वैयक्तिक पातळीवर मदत व मार्गदर्शन
- बाराहून अधिक नातेवाईक व गरजू मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून त्यांना स्वावलंबी बनविले
- जयहिंद लोकचळवळीच्या दंडकारण्य अभियानाचे प्रमुख समन्वयक
- पर्यावरण संवर्धन, जलसंधारण व वृक्षारोपण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य
- फादर हार्मन बाखर व फादर रॉबर्ट डिकोस्टा यांच्या सहकार्याने लाखो वृक्षांच्या लागवड व संवर्धन मोहिमेत सक्रिय सहभाग
- कोळवाडे परिसरातील उघडे डोंगर हिरवेगार करण्यासाठी विशेष योगदान
- सुमारे ६ लाख १० हजारांहून अधिक वृक्षसंवर्धनाच्या उपक्रमात नेतृत्व
- रोपवाटिका निर्मिती, वनसंवर्धन आणि हरित ग्रामविकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न
- नाशिक, सातारा व अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये पर्यावरण चळवळीचा विस्तार
- सायखिंडी परिसरातील कृषी व शैक्षणिक विकास प्रकल्पांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान
- समाजसेवा, शिक्षण, पर्यावरण आणि ग्रामविकास यांचा समन्वय साधणारे लोकशिक्षक म्हणून ओळख
- सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणीय कार्यात सक्रिय सहभाग
- जीवनकार्य : आदिवासी शिक्षण, समाजोन्नती आणि हरित भविष्य घडविण्यासाठी समर्पित आयुष्य
- पत्नी - मंगल, मुले - अक्षय, जयश्री, आरती, सूनबाई - भारती

## आदीवासी विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत स्वप्न पेरणारा अवलिया

**– आमदार सत्यजीत तांबे**
**आमदार, विधान परिषद, मुंबई**

समाज परिवर्तनाचा खरा पाया शिक्षणात असतो आणि त्या शिक्षणाला दिशा देणारा शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार असतो. जयहिंद आदिवासी आश्रम शाळेचे दशरथ वर्पे सर यांनी आयुष्यभर हीच भूमिका समर्थपणे निभावली. संगमनेर तालुक्यातील दुर्गम कोळवाडे परिसरात कार्यरत असताना त्यांनी आदिवासी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा ध्यास घेतला. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले.

मुख्याध्यापक म्हणून त्यांनी शाळेच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, नेतृत्वगुण आणि संस्कार यांवर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या कार्यकाळात जयहिंद आदिवासी आश्रम शाळा ही केवळ शिक्षणसंस्था न राहता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र बनली.

वर्पे सरांचे योगदान शिक्षणापुरते मर्यादित राहिले नाही. पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, जलसंधारण आणि ग्रामीण विकासाच्या उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय नेतृत्व केले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या विचारांचा वारसा जपत त्यांनी समाजहिताचे अनेक उपक्रम यशस्वी केले.

> **दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाची ज्योत पेटवून समाजपरिवर्तनाचे कार्य करणारे दशरथ वर्पे सर यांनी शिक्षण, संस्कार आणि समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी राहील.**


साधेपणा, प्रामाणिकपणा, अभ्यासू वृत्ती आणि काम पूर्णत्वास नेण्याची जिद्द ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यार्थ्यांचे यश, संस्थेची प्रगती आणि समाजातील सकारात्मक बदल हाच त्यांच्या आयुष्याचा खरा सन्मान ठरला.

आज ते प्रशासकीय जबाबदाऱ्यांतून निवृत्त होत असले तरी त्यांनी घडवलेली विद्यार्थीपिढी, रुजवलेले संस्कार आणि समाजसेवेची प्रेरणा पुढील अनेक वर्षे मार्गदर्शक ठरणार आहे. दशरथ वर्पे सर आणि सौ. मंगलताई यांनी जपलेली शिक्षणसेवा, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची परंपरा समाजासाठी कायम प्रेरणादायी राहील.



## ज्ञानतपाचा वटवृक्ष

**– दुर्गाताई तांबे**
**प्रकल्प प्रमुख, दंडकारण्य अभियान**



संगमनेर तालुक्यातील कोळवाडे या गावी राहणारे शेतकरी कुटुंबातील वर्पे परिवार विठोबा, विमलबाई यांच्या कुटुंबात बाबजी, दशरथ, सुनिता, अनिता, वनिता, रतन ही मुले जन्माला आली. मात्र विठोबा बाबांनी मुलांना शिकवण्यासाठी शेतात खूप कष्ट केले स्वतःसाठी सर्व काटकसर करून प्रपंच उभा केला.

श्री दशरथ म्हणजेच वर्पे सर, स्वतःच्या हुशारीने पुढे शिकतच राहिले. सरांचे वडीलही खूप हुशार, मेहनती व आई सुद्धा फार हुशार कष्टाळू होती. सरांचे मामा गणितात फार हुशार, खांडगाव येथील स्व. शिवाजी ढगे गाव त्यांना राजे म्हणत. सरांच्या मामी गीताबाई याही कष्टाळू होत्या. जमीन नसल्याने विड्या बांधूनच कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. मामांच्या कुटुंबातील कन्या मंगल ही बिड्या बांधून शिक्षण घेत होती. सरांनी मामाच्या कन्याबरोबर विवाह केला. मंगल दशरथ वर्पे झाली अन् त्यांचं नशिबच उजळलं. एक बुद्धिमान, कष्टाळू पती मिळाला. आणि सरांच्या खांद्याला खांदा देऊन लावून मंगल ताई सुद्धा सर्व कामे करू लागली.

सरांना त्यांच्या मामा, वडिलांसारखी कष्टाची सवय होती. शिक्षण झाले आणि ति. भाऊसाहेब थोरात (दादा), श्री.बाळासाहेब थोरात साहेब, डॉ.सुधीर तांबे यांनी कोळवाड्याला जयहिंद आश्रमशाळा काढली. त्यात सर मुख्याध्यापक झाले व तेव्हापासून जयहिंद आश्रम शाळा अन् वर्पे सर एक समीकरणच जमले. हातात घेतलेले काम पूर्णत्वास नेणारच असा स्वभाव त्यांचात वर्पे, ढगे परिवारातून आला. सरांचे जीवन

> **कष्ट, जिद्द आणि सेवाभाव यांच्या बळावर दशरथ वर्पे सर यांनी शिक्षण व समाजकार्यात उल्लेखनीय कार्य उभे केले. जयहिंद आश्रमशाळेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवताना त्यांना सौ. मंगलताईंची मोलाची साथ लाभली. हा सहप्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.**

लहानपणापासून ग्रामीण भागातच गेल्याने सकाळ झाली की पहिली न्याहारी करायची. (कालवण - भाकरी) खायची व लगेच कामाला जुपायचे आळस कंटाळा काही माहीतच नाही.

कोळवाडे येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील राहिले. दंडकारण्यात अभियानाच्या पर्यावरण चळवळीत पूर्णतः झोकुन दिले. अनेक डोंगर हिरवे करण्याचे श्रेय सरांना आहे. आश्रम शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना सामाजिक शैक्षणिक शिक्षण देऊन संस्कार दिले त्यातून आज अनेक विद्यार्थी मोठ्या हुद्द्यावर आहेत त्यांना सरांचा अभिमान वाटतो.

सरांचे एकत्र कुटुंब आहे. वडील बंधू, वहिनी, मुले जयश्री, आरती, अक्षय, विद्या, प्रज्ञा, ओमकार, असा मोठा परिवार आहे. सर्व मुले उच्चशिक्षित आहे. असे वर्पे सर आता सेवानिवृत्त झाले आहेत. सरांना व मंगलताईंना भावी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा...!

# आदीवासींचा कैवारी, वृक्ष पंढरीचा वारकरी

## जयहिंद आदीवासी आश्रमशाळा, कोळवाडेचे मुख्याध्यापक दशरथ वर्पे सर



कर्तबगार व्यक्तीचा जन्म कोणत्या कुटुंबात व्हावा हे जरी त्याच्या हातात नसले तरी उत्तम संस्कार आणि मिळालेल्या संधीच्या आधारे स्वतःचा उद्धार करीत असताना हजारो व्यक्तींच्या उद्धाराचा आधार असलेले दशरथ विठोबा वर्पे सर यांची जीवनगाथा, जीवन वाटचाल म्हणजे खडतर अडचणींचा विस्मयजनक प्रवास आहे. संगमनेरच्या दक्षिणेस कोळवाडे गावातील विठोबा नामदेव वर्पे व विमलआई विठोबा वर्पे यांचे सुपुत्र म्हणून दशरथ वर्पे सरांचा जन्म १ जून १९६९ साली झाला.

पन्नास वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील गरिबी व अडचणींशी वर्पे सरांना सामना करावा लागला. शेतकरी कुटुंबात शेती असली तरी सुखाचे जगणे नव्हते. दुष्काळ, गरिबी आणि अज्ञानाने शेतकरी सतत समस्याग्रस्त असायचे. दशरथ विठोबा वर्पे सरांचे बालपणही असेच सतत समस्याग्रस्त असायचे. १९७९ सालापर्यंत चौथीचे शिक्षण कोळवाडे येथे झाले आणि पुढील शिक्षणासाठी मल्हारराव होळकर विद्यालय अंभोरे येथे त्यांनी प्रवेश घेतला. मनुष्याचे पोट आणि गरिबी अतिशय वाईट असते. परिस्थितीमुळे मिळेल ते काम करून उपजीविका करावी लागते. कोळवाडे येथे सुरू असलेल्या बंधाऱ्याच्या कामावर गाढवे हाकण्याचे काम तीन महिने वर्पे सरांना करावे लागले आणि रोज होता फक्त तीन रुपये. त्यानंतर चार महिने गवंड्याच्या हाताखाली मजूर म्हणून काम करावे लागले आणि मजुरी मिळायची दररोज सात रुपये. तत्पूर्वी १९७२ च्या दुष्काळात सुकडी खाऊन दिवस काढावे लागले. आई विमलबाई आणि वडील विठोबा बाबा यांची गरिबी असली तरी विचार संस्कार उत्तम होते.

दशरथ वर्पे सरांना संकटाशी लढण्याची व प्रगतीची प्रेरणा आई-वडिलांकडूनच मिळाली. ग्रामीण भागातील जीवनामुळे जगण्याची शिकण्याची कोणतीच दिशा निश्चित नव्हती परंतु 'वर्म चांगले असेल तर कर्म उत्तम घडते' याप्रमाणे सातवीच्या वर्गात असताना शाळा बंद झाली. मात्र मल्हारराव होळकर विद्यालयाचे शिक्षक अरविंद आहेर सर यांनी शालाबाह्य झालेल्या दशरथ वर्पे सरांना पुन्हा शाळेत नेले आणि शिक्षणाची खंडित झालेली ज्ञानगंगा पुन्हा प्रवाहित झाली. १९८५ साली पेटीट ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावी कॉमर्सला ॲडमिशन घेऊन एस. के. लोहे लायब्ररीत काम केले. जिद्दीने अभ्यासही केला आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेत पेटीट विद्यालयात प्रथम क्रमांकाने यश संपादन केले.

गरिबी असली तरी ज्ञानाचा दिवा गरिबाच्या घरातही लागतो हे वर्पे सरांनी प्रयत्न आणि जिद्दीने सिद्ध केले. अज्ञान आणि गरिबीच्या अडचणींची रात्र संपून उमेदीचा सूर्योदय झाला आणि संपूर्ण शिक्षण होईपर्यंत दशरथ वर्पे सरांनी अपयशाचा स्पर्श कधीच होऊ दिला नाही. परिस्थितीचे भान आणि शिक्षणाची जाण ठेवून जगण्याची लढाई जिंकत दशरथ वर्पे सरांनी संगमनेर महाविद्यालयातून १९९० साली बी.कॉम पदवी मिळवली. बारावी कॉमर्स ते एम कॉम या शैक्षणिक वाटचालीत त्यांना अनेक मित्र मिळाले अनेकांचे सहकार्य लाभले. अनेकांना सहकार्य केले. ३५ वर्षांपूर्वी ग्रामीण विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण अतिशय अडचणीचे होते. अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी भाड्याची खोली घेऊन राहायचे. काही नातेवाईकांकडे असायचे तर काही अर्धवेळ नोकरी करून शिक्षण पूर्ण करायचे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जेवणाचे डबे एसटी मधून येत असल्याने सकाळी संध्याकाळी जेवणाच्या डब्यांसाठी विद्यार्थ्यांची एसटी स्टँडवर गर्दी असायची. मात्र वर्पे सरांना कोळवाडे येथील पोस्टमन थिगळे मामा यांनी ७ वर्षे संगमनेरला जेवणाचे डबे पोहोच केले.

१९९२ सन एम कॉम च्या पहिल्या वर्षाला असतानाच दशरथ वर्पे सरांच्या आई-वडिलांनी त्यांना लग्नासाठी तयार केले. घरच्यांचा आग्रह आणि होणारी पत्नी मामाचीच मुलगी असल्याने ओळखीचा पसंतीचा भाग फारसा महत्त्वाचा ठरला नाही. खांडगाव येथील मामा शिवाजीराव ढगे यांची मुलगी मंगलताईंनी दशरथ वर्पे सरांच्या जीवनात १८/४/१९९२ रोजी पत्नी म्हणून प्रवेश केला. लग्नानंतर एम कॉम ची परीक्षा देऊन वर्पे सर उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. नोकरीचा शोध सुरू झाला. पहिली नोकरी मिळाली ती शारदा विद्यालयातील क्लार्क म्हणून. यापूर्वी वर्पे सरांनी संगमनेर मधील प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट अशोक जी मणियार यांच्या हाताखाली काम केलेले होते त्यांची ओळख उपयोगाला आली तसेच संस्थेचे चेअरमन ओंकारनाथ मालपाणी, सेक्रेटरी मोहनलालजी मणियार यांनी नियुक्ती दिल्यानंतर शारदा विद्यालयात वर्पे सरांनी नोकरी सुरू केली. त्यांचे सरांना बहुमोल मार्गदर्शन मिळाले. एम. कॉम चे शिक्षण असल्याने तेथील काही शिक्षकांनी वर्पे सरांना बी.एड करण्याचा सल्ला दिला आणि त्यानुसार त्यांनी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या बी.एड कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथील शिक्षक प्रा. डॉ. बाळासाहेब मुरादे सर यांनी त्यांना अतिशय उत्तम मार्गदर्शन केले, मनापासून सहकार्य केले.

एम कॉम, बीएड अशी उच्च शिक्षणाची पात्रता झाली असल्याने प्राध्यापकाच्या नोकरीचा शोध महाविद्यालयांमधून सुरू झाला; परंतु अनेक ठिकाणी प्रयत्न करूनही यश आले नाही. कोळवाडे गावाजवळ असलेल्या पिंपरणे येथे गगनगिरी विद्यालयामध्ये नोकरी वर्पे सरांना मिळाली आणि सरांना जीवनामध्ये शिक्षक असल्याची जाणीव झाली. घरची गरिबी, लग्न झालेले अशा परिस्थितीत जीवन जगणे म्हणजे उन्हाळ्यात डांबरी रस्त्याने अनवाणी पायाने चालण्यासारखे असते. असे अनेक प्रकारचे अनुभव वर्पे सरांनी सहन केले. बुडाला जाळ असला तरी शिट्ट्या मारणाऱ्या कुकरप्रमाणे वर्पे सरांचे वागणे प्रेमळ, वृत्ती सहकार्याची आणि कोणत्याही कष्टाची तयारी असल्याने संघर्ष मोठा असला तरी जिंकण्याची जिद्द असल्याने जीवनाची वाटचाल यशाच्या बाजूने चालू राहिली. २ ऑक्टोबर १९९४ हा दिवस दशरथ वर्पे सरांच्या यशस्वी जीवनाच्या पायाभरणीचा आहे. या दिवशी लोकनेते बाळासाहेब थोरात व डॉ. सुधीर तांबे यांनी कोळवाडे गावात जयहिंद आश्रम शाळा सुरू करण्याचा श्रीगणेशा केला. शुभारंभाचा नारळ फोडला. दशरथ वर्पे सरांचे चुलते व काही ग्रामस्थ सायकल वरून जोर्वे येथे लोकनेते बाळासाहेब थोरात साहेब यांचेकडे गेले आणि त्यांनी दशरथ वर्पे सरांच्या नोकरीसाठी आग्रह धरला. मा. दादांनी सर्व प्रकारची चौकशी केल्यानंतर जयहिंद आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकाची वर्पे सरांना नियुक्ती दिली आणि पुन्हा एकदा शिक्षण क्षेत्रात उच्च स्तरावर काम करण्याची संधी दशरथ वर्पे सरांना मिळाली.



**विशेष संपादकीय**

**– किसन भाऊ हासे**
**संस्थापक-संपादक, दैनिक युवावार्ता, संगमनेर**

जयहिंद आश्रम शाळेची स्थापना नव्याने झालेली असल्याने, आदिवासी ग्रामीण भागात झालेली असल्याने पुरेशी जागा नाही, पुरेशी मुले नाही, इमारत नाही, राहण्याची व्यवस्था नाही, होस्टेल नाही अशा अनेक अडचणी असताना आदरणीय दादांचा आशीर्वाद, ग्रामस्थांचे सहकार्य यातून चिमणीच्या घरट्याप्रमाणे एक एक सुविधा निर्माण करीत जयहिंद आश्रम शाळेची इमारत, विद्यार्थी संख्या आकारास येऊ लागली. लोकनेते बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे यांनी आर्थिक मदत तर केलीच मात्र कुटूंबातील सदस्याप्रमाणे प्रेमही केले. कोणत्याही परिस्थितीत हार जाण्याचा स्वभाव नसलेल्या दशरथ वर्पे सरांनी प्रयत्नाची पराकाष्ठा करून १९९८ पर्यंत आश्रम शाळेची शासकीय सुविधा उपलब्धता, शिक्षकांचे पगार, इमारती यामध्ये उल्लेखनीय यश मिळविले. वर्पे सरांची धडपड व कोळवाडे गावाच्या ग्रामस्थांचे सहकार्य लक्षात घेऊन सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळवून दिले. संगमनेर तालुक्यातील विद्यार्थ्यांबरोबर अकोले, सिन्नर, पारनेर तालुक्यातील विद्यार्थी सुद्धा जयहिंद आश्रम शाळेत प्रवेशासाठी येऊ लागले. विद्यार्थी संख्या वाढली, शिक्षक वाढले आणि मुख्याध्यापक म्हणून दशरथ वर्पे सरांची जबाबदारी ही मोठ्या प्रमाणात वाढली.



ग्रामीण आदिवासी भागात गरिबांच्या मुलांसाठी शाळा व्यवस्थित चालविणे ही फार मोठी कसरत आहे आणि त्यासाठी समवेत असलेले शिक्षक व कर्मचाऱ्यांना बरोबर ठेवून शाळेचा सर्वांगीण दर्जा उंचावणे ही तपश्चर्या दशरथ वर्पे सरांनी ३२ वर्षे केली म्हणूनच शाळेचे माजी विद्यार्थी आणि कर्मचारी आजही वर्पे सरांच्या सहकार्यासाठी धावून येतात. त्यांना हवे ते सहकार्य करतात. सेवानिवृत्तीनंतरही वर्पे सरांचे शाळेचे प्रेम कमी झालेले नाही. गाव बांधिलकीच्या नात्याने ते सहकार्यासाठी सतत तयार असतात. शैक्षणिक, सामाजिक कार्यात समर्पित भावनेने काम करीत असताना त्यांच्या पत्नी सौ. मंगलताईंच्या सहकार्याने त्यांनी स्वतःच्या मुलांबरोबर भावा-बहिणींच्या मुलांनाही अतिशय चांगल्या प्रकारचं शिक्षण दिले. बाराहून अधिक मुलांना संगमनेरला आणून शिकविले. स्वावलंबी बनविले. सौ मंगलताईंनी घरातील कुटुंब सदस्यांना प्रगतीसाठी प्रोत्साहन दिले. नाते संबंध जपले. सासू-सासऱ्यांची, वडीलधाऱ्यांची मनापासून सेवा केली. म्हणूनच सर्व कुटुंब प्रेमाच्या धाग्यात बांधून आहे. त्यांच्या मातोश्रींच्या निधनानंतर आईसाठी मंदिर बांधणारे वर्पे कुटुंब हा आदर्शाचा, कृतज्ञतेचा प्रेरणा मार्ग आहे. वडील विठोबा नामदेव वर्पे, चुलते दादाभाऊ यांच्या कष्टातून आणि आई कै. विमल व चुलती सौ. सिंधुबाई यांच्या संस्काराच्या शिदोरीतून सुसंस्कृत कुटूंब उभे राहिले. भाऊ बाबाजी, बहिण रतन किसन येवले, सुनिता हौशिराम पाबळ, अनिता संपत मालुंजकर यांच्या प्रेमाच्या धाग्यामुळे वर्पे सर संकटाचा सामना धिराने करत राहिले. मुलगा अक्षय, मुली जयश्री रामनाथ राहाणे, आरती वर्पे यांनीसुद्धा वडिलांकडे वेळ मिळत नसल्याची तक्रार केली नाही. सुनबाई भारती यासुद्धा वर्पे परिवाराशी एकरूप झाल्या आहेत. चुलत भाऊ बहिण अशोक, नवनाथ, वनिता, भावजई पुष्पलता, जयश्री, नीता, पुतणी डॉ. विद्या, प्रज्ञा यांनी सरांना साथ दिली आणि सरांनीही त्यांना मार्गदर्शन केले.

मा. दशरथ वर्पे सरांचे प्रेरणास्थान सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात उर्फ दादा यांचेकडून निरपेक्ष सेवेचा वारसा जोपासला आणि त्यांनी सुरू केलेल्या दंडकारण्य अभियानास वर्पे सरांनी पूर्ण वाहून घेतले. फादर हार्मन बाखर व फादर रॉबर्ट डिकोस्टा यांच्या सहकार्याने कोळवाडे गावचे उघडे डोंगर हिरवेगार केले. लाखो वृक्षांचे रोपण करून संवर्धन केले. विविध प्रकारची झाडे जगवली-वाढवली. रोपांची नर्सरी तयार केली. कोळवाडे गावच्या हरित वृक्षांची मालिका संपूर्ण संगमनेर तालुक्यात पसरली. २५ वर्षांपूर्वीचे उघडे डोंगर वृक्षांनी सजले. याच प्रेरणेतून संगमनेर मधील अनेक परिवार वृक्षारोपणासाठी, डोंगर हिरवेगार करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले. त्यामध्ये मालपाणी परिवाराचा उल्लेख महत्त्वाचा आहे. वर्पे सरांनी या सर्वांना एकत्रित घेऊन संगमनेर तालुक्यातील डोंगर वृक्ष संपत्तीने समृद्ध केले आहेत. त्यांच्या वृक्षारोपण आणि संवर्धनाचे कार्य आता नाशिक, सातारा जिल्ह्यातही पोहोचले आहे. दंडकारण्य अभियानाच्या कार्याने झपाटलेला हा माणूस दिवस-रात्र याच विचारात राहून कार्य करीत असताना हजारो हात सहकार्यासाठी पुढे आले आहेत. सायखिंडी गावातील खोल दऱ्याखोऱ्यांची जमीन कृषी महाविद्यालयासाठी सपाट करून शेजारच्या शेतकऱ्यांच्या जमिनीही त्यांनी सपाट करून दिल्या आहेत.

पुढील पाच वर्षात सायखिंडी गाव पर्यटन व कृषी क्षेत्राचे शिक्षणाचे केंद्र म्हणून उदयास येईल. यामध्ये वर्पे सरांचे प्रचंड योगदान आहे. त्यासाठी सरांनी केलेल्या मेहनतीचे विशेष कौतुक अमृत उद्योग समूहाचे प्रमुख व माजी मंत्री बाळासाहेब थोरात साहेब यांनी केले आहे. दशरथ वर्पे सरांचे मार्गदर्शक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व सौ. दुर्गाताई तांबे यांच्या प्रेरणेतून पुढील काळात लाखो वृक्षांच्या रोपणासाठी, संवर्धनासाठी वर्पे सरांनी त्यांचे जीवन समर्पित केले आहे. शासकीय सेवेतून निवृत्ती घेतली तरी सामाजिक कार्यातील जबाबदारी अखेरपर्यंत निभवण्याची जिद्द असणारा हा अवलिया जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या अभंग ओळींना पात्र झाला आहे.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे
पक्षीही सुस्वरे आळविती
किंवा
तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता

सर्वांचे सन्मित्र दशरथ वर्पे सरांच्या जीवन वाटचालीस शुभेच्छा.

---

# चालता फिरता कॉम्प्युटर

**– डॉ. जयश्री थोरात**
**अध्यक्ष, एकवीरा फाऊंडेशन**




आयुष्यात अनेक माणसे भेटतात; मात्र काही व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने, समर्पणाने आणि निष्ठेने समाजमनावर कायमस्वरूपी ठसा उमटवून जातात. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात तब्बल ३२ वर्षे अविरत सेवा देत शेकडो आदिवासी कुटुंबांचे आयुष्य उजळविणारे आदरणीय दशरथ वर्पे सर हे असेच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा सेवापूर्ती सोहळा हा केवळ नोकरीचा शेवट नसून, त्यांच्या कार्याचा आणि समाजाशी असलेल्या बांधिलकीचा गौरव आहे.

वर्पे सरांबद्दल बोलताना मला नेहमी वाटते की ते एक चालते-बोलते ज्ञानकोश आहेत. कोणत्याही विषयाची माहिती असो, ती त्यांच्या ओठांवर तत्पर असते. अनेक जबाबदाऱ्या एकाच वेळी यशस्वीपणे पार पाडण्याचे त्यांचे कौशल्य विलक्षण आहे. त्यांच्याकडे सोपवलेले कोणतेही काम अपूर्ण राहिले, असे कधीच घडले नाही. त्यामुळेच ते अनेकांसाठी विश्वासाचे आणि आधाराचे स्थान बनले आहेत.

स्वर्गीय भाऊसाहेब थोरात दादांचे तालुका हिरवागार करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राबविण्यात आलेल्या 'दंडकारण्य अभियानात' वर्पे सरांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. या अभियानाविषयी त्यांची निष्ठा आणि तळमळ विलक्षण आहे. कंबरेचे फ्रॅक्चर झाले असतानाही त्यांनी कामाची जबाबदारी सोडली नाही. बरे झाल्यानंतर हातात वॉकर घेऊन खांडेश्वर डोंगरावरील वृक्षांची पाहणी करण्यासाठी जाणे, हे त्यांच्या जिद्दीचे आणि पर्यावरणप्रेमाचे जिवंत उदाहरण आहे. जयहिंद आदिवासी आश्रमशाळा, कोळवाडे येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असताना त्यांनी असंख्य आदिवासी मुला-मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी, संस्कार आणि आत्मविश्वास देऊन त्यांचे जीवन घडवले. अनेक कुटुंबांमध्ये शिक्षणाचा प्रकाश पोहोचविण्याचे मोठे कार्य त्यांनी केले. आज त्यांच्या सेवापूर्तीचा कार्यक्रम त्यांच्या विद्यार्थ्यांनी प्रेमाने आणि कृतज्ञतेने आयोजित केला आहे, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.

वर्पे सर हे केवळ उत्कृष्ट शिक्षकच नव्हे, तर आदर्श कुटुंबप्रमुखही आहेत. त्यांच्या पत्नी सौ. मंगल वर्पे यांनी त्यांना प्रत्येक टप्प्यावर मोलाची साथ दिली. दोघांनी मिळून आपल्या मुलांसह कुटुंबातील अनेक मुलांना शिक्षण, संस्कार आणि आधार दिला. अनेक नातलगांच्या शिक्षणापासून ते त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांपर्यंत सर्व गोष्टी त्यांनी प्रेमाने सांभाळल्या.

आज सेवापूर्तीच्या या टप्प्यावर वर्पे सरांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान हे त्यांच्या प्रामाणिक कार्याचे फळ आहे. त्यांनी केवळ नोकरी केली नाही, तर समाज घडवला, माणसे जोडली आणि अनेकांच्या आयुष्याला दिशा दिली. आदरणीय दशरथ वर्पे सरांना पुढील निरोगी, दीर्घ आणि आनंदी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांचे कार्य आणि विचार येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतील.

# अवलिया व्यक्तिमत्त्व...दशरथ वर्पे सर

काही माणसं इतिहास घडविण्यासाठीच जन्माला आलेली असतात. ज्या क्षेत्रात पाऊल ठेवतील ते पाऊल तर दमदार टाकतातच, पण कामही तसंच रुबाबदार अन् इमानदार करतात. या कामातूनच आपली वेगळी ओळख निर्माण करतात. त्यांचं हे वेगळेपण अनेकांचं प्रेरणास्त्रोत बनतं. असंच एक प्रेरणादायी नाव म्हणजे आदरणीय दशरथ वर्पे सर... होय, वर्पे सर... आदिवासी आश्रमशाळा कोळवाडे मुख्याध्यापक. ज्यांनी अनेक आदिवासी मुलांच्या जीवनात स्फुल्लिंग जागवलं. मुख्याध्यापक कसा असावा याचे उदाहरण दाखवून दिले. मुख्याध्यापक उत्साही, दिशादर्शक, नवोपक्रमशील, प्रेरणादायी आणि नवनिर्माण करणारा असेल तर शाळा उत्तुंग यशाकडे अन् विद्यार्थी उज्ज्वल जीवनाकडे भरारी घेतात. हेच कार्य सरांच्या हातून अविरत घडलं. म्हणून तर झोपडीत, डोंगराच्या कुशीत, नदीच्या थडीला राहणारी गोरगरीब मुलं आनंदाने दिल्लीवारी करून आली. आदिवासी आश्रमशाळा कोळवाडे आणि दशरथ वर्पे सर हे समीकरण ठरलेलं.

सरांचा सेवारंभ ३ ऑक्टोबर १९९४ चा. माझ्या डोळ्यासमोर तो प्रसंग आजही आहे. मी गुळवेवस्ती, रहिमपूर या शाळेत एकाच वर्गात इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांना जोरात शिकवत होते आणि साधारण दुपारी दोन ते तीनची वेळ. दोन तरुण सायकलवर शाळेसमोर आले. सायकल निंबाखाली लावली आणि शाळेच्या पडवीत आले. अदबीने शाळेची विचारपूस करू लागले. येण्याचा उद्देश सांगितला. तोपर्यंत आदिवासी शाळा जवळ सुरू झाली हे माहीत नव्हते. आश्रमशाळा म्हटलं की डोळ्यासमोर एक वेगळं चित्र येतं. पण तरीही जर ही गैरहजर राहून नदीनाल्यावर भटकणारी मुलं एका ठिकाणी राहून शिक्षण घेणार असतील तर चांगलंच आहे असं वाटलं. वर्गाची हजेरी घेऊन शाळेच्या पडवीत खाली फरशीवर बसून सरांनी एकेका मुलांची माहिती घेतली. ना खुर्ची आहे का म्हणून बडेजाव, ना फरशीवर कागद ठेवून कसं लिहू याचा कमीपणा. तोपर्यंत आजूबाजूचे पालकही गोळा झाले. सरांनी त्यांनाही येण्याचा हेतू सांगितला. प्रसंग छोटासा; पण या दोन तासांच्या चर्चेनंतर आणि करून दाखवायचंय या ठाम बोलण्यातून हे काहीतरी वेगळं रसायन आहे, याची तेव्हाच जाणीव झाली होती. त्यावेळी पाहिलेलं चेहऱ्यावरील तेच भाव, तेच हास्य, तसाच पेहराव, तसाच साधा-सरळ स्वभावातील बोलणं एवढ्या यशोशिखरावर आज असतानाही बदललं नाही, हेच वेगळेपण आदर देऊन जाते. सरांनी आपल्या ३५ वर्षांच्या सेवाकाळात जयहिंद आश्रमशाळा कोळवाडे हे नाव हजारो विद्यार्थ्यांच्या हृदयात कोरलं. ते सरांच्या शिस्त, आदरयुक्त भीती, उत्तम नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणीमुळेच. विद्यार्थ्यांनी घडवून आणलेला हा सोहळा त्याचाच परिपाक आहे. सर, खरंच आम्हाला आपला अभिमान आहे. म्हणूनच म्हणावंसं वाटतं...

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे,
मंगलाने माखलेले सुंदराचे सोहळे.

आपण मंगलमय कार्य केले म्हणून आजचा सुदिन पाहिला. सरांशी जवळून परिचय नसतानाही सूर्याप्रमाणे तेजस्वी, मुंगीप्रमाणे उद्योगी, विद्यार्थ्यांनाच देव मानणारे, त्यांच्याच यशात आनंद शोधणारे असे वर्पे सरांबद्दल नेहमीच आदर वाटायचा.

पुढे योगायोगाने नात्याची वीण गुंफण्याचा प्रसंग आला. अगदी कमी आणि मोजक्या शब्दांत समोरच्यालाही पटणारं बोलून सरांनी नात्याला धाग्यात हळुवारपणे बांधलं आणि पिढ्यानपिढ्यांचा मनमिळाऊ संबंध निर्माण करण्यात सिंहाचा वाटा उचलला. आज नातं विखुरलेल्या स्वरूपात आहे. माणसं दुरावताना पावलोपावली पाहतोय. पण सरांनी सर्व नातलग एकाच धाग्यात जपमाळेप्रमाणे ओवलेत, हे मनाला भावतं आणि सरांचं वेगळेपण ठाशीवपणे दिसतं. समोरच्याला आदरयुक्त बोलून आपलंसं करावं, हा गुण तर प्रत्येकाने त्यांच्याकडूनच शिकावा. आम्ही त्या नात्याचे भागीदार झाल्याने मनस्वी खूप आनंद आहे. सर, आपल्याबद्दल बोलताना एक मोठा ग्रंथ तयार होईल, एवढं आपलं कार्य आहे. पण जाताजाता एवढंच म्हणेन...

सूर्यासारखे तळपून जावे क्षितिजावरुनी जाताना,
दगडालाही पाझर यावा सेवापूर्ती होताना.

अशीच अवस्था आज सर्व विद्यार्थी व शिक्षकांची झाली असणार. ही वास्तूदेखील सेवापूर्तीनिमित्ताने नक्कीच मुक अश्रू ढाळत असेल. आपल्या हातून मंगलमय कार्य रेखाटताना आपली अर्धांगिनी मंगलताई यांचाही त्याग, कष्ट विसरून चालणार नाही. त्यांच्या त्यागाला, कष्टाला वंदन. =ज

असो, सेवारंभ झाला की सेवापूर्ती होणारच असते. यापुढील आयुष्य असेच वेगळ्या अथांग दुनियेत अजूनही काहीतरी भव्य-दिव्य करण्यात आणि सुखात, आनंदात जावो, हीच साईचरणी प्रार्थना व सेवापूर्तीनिमित्त शुभेच्छा.

**– मुक्ता शिंदे / काशीद (मो. ९९२२९३७०२३)**

# अहिल्यानगर पतसंस्था कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी मोहन देशमुख यांची निवड

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील राजापूर येथील स्वातंत्र्यसैनिक कै. बाबुराव सावळेराम देशमुख पतसंस्थेचे व्यवस्थापक मोहन देशमुख यांची अहिल्यानगर जिल्हा पतसंस्था कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. जिल्हा पतसंस्था कर्मचारी संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक ड. सुधीर टोकेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक पार पडली. या बैठकीत सन २०२६ या आर्थिक वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.



अध्यक्षपदी मोहन देशमुख यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी सुनील क्षीरसागर, समीर खडके आणि राजेंद्र भालेराव यांची निवड झाली. जनरल सेक्रेटरीपदी ड. सुधीर टोकेकर, खजिनदारपदी कैलास मिसाळ, तर सहसचिवपदी सुनील सुकदेव काळे, एकनाथ गंगाराम शिंदे आणि किसन दादासाहेब वऱ्हाडे यांची एकमताने निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीमध्ये कार्यकारिणी सदस्य म्हणून पांडुरंग मारुती जाधव, प्रशांत दिवेकर, विजू सदाफुले, शेख अल्ताफ, संजय भगत, दिलीप सुपेकर, सुवर्णा धाडगे, संजय गोरडे, तुषार दारके आणि राजेंद्र खामकर यांची निवड करण्यात आली. तसेच कॉम. सूर्यकांत ऊर्फ सुरेश पानसरे यांची जिल्हा संघटक तर विकास शिंदे यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. मोहन देशमुख यांच्या अध्यक्षपदी झालेल्या निवडीबद्दल पतसंस्था क्षेत्रातील पदाधिकारी, कर्मचारी व सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कॉलेजेसमधील 'नावापुरती हजेरी' बंद, कोचिंग क्लासेसला बसणार चाप

मुंबई (प्रतिनिधी)-

राज्यातील कनिष्ठ महाविद्यालये आणि खासगी कोचिंग क्लासेस यांच्यातील छुप्या युतीमुळे शाळा-कॉलेजांमध्ये निर्माण झालेल्या 'डमी अटेंडन्स' संस्कृतीला कायमचा लगाम घालण्यासाठी राज्य सरकारने अत्यंत आक्रमक पावले उचलली आहेत. राज्यातील सुमारे ९,५११ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आता विद्यार्थ्यांसाठी 'बायोमेट्रिक हजेरी' पद्धत सक्तीची केली जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी माध्यमिक शिक्षण विभागाकडून तब्बल १०० कोटी रुपयांच्या खर्चाचा सविस्तर प्रस्ताव तयार केला जात असून, तो मंजुरीसाठी लवकरच शासनाकडे पाठवला जाणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे कनिष्ठ महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसच्या संपूर्ण नेटवर्कमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

सध्या शिक्षण क्षेत्रात अकरावी आणि बारावीच्या प्रवेशांनंतर 'इंटीग्रेटेड एज्युकेशन' नावाचा एक नवा प्रकार मोठ्या प्रमाणावर फोफावला आहे. यामध्ये अनेक कनिष्ठ महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस चालक एकत्रितपणे काम करतात. विद्यार्थी ऑनलाइन पोर्टलवरून कॉलेजमध्ये प्रवेश तर घेतात, परंतु प्रत्यक्षात ते कॉलेजमध्ये न जाता संपूर्ण वेळ कोचिंग क्लासेसमध्ये 'नीट' (छएएढ), 'जेईई' (गएए) सारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. सुरुवातीला पालक आणि विद्यार्थ्यांना याची पुरेशी कल्पना नसते, मात्र क्लासेसमध्ये प्रवेश घेतल्यानंतर कॉलेजमधील हजेरीची चिंता न करण्याचे आश्वासन दिले जाते. यामुळे विद्यार्थी महाविद्यालयात क्वचितच फिरकतात, मात्र कोचिंग क्लासेसमध्ये त्यांची उपस्थिती नियमित असते. या प्रकारामुळे कनिष्ठ महाविद्यालयांमधील केवळ नफ्यासाठी चालणारे हे साटेलोटे माध्यमिक शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे.



या जीवघेण्या आणि अनैतिक शैक्षणिक स्पर्धेला आळा घालण्यासाठी शासनाने कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये ७५ टक्के हजेरीची अट कडक करण्याचा निर्णय घेतला आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याची दैनिक बायोमेट्रिक हजेरी ७५ टक्क्यांपेक्षा कमी भरली, तर त्याला थेट बारावीच्या बोर्ड परीक्षेला बसण्यास बंदी घातली जाईल. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील काही विशिष्ट कनिष्ठ महाविद्यालये आणि खासगी कोचिंग क्लासेसचे हे जाळे तोडण्यासाठीच ही बायोमेट्रिक प्रणाली आणली जात आहे. शासनाने या प्रस्तावाला मंजुरी देताच संपूर्ण राज्यात त्याची तातडीने आणि कडक अंमलबजावणी केली जाईल. तसेच, राज्य परीक्षा मंडळाचे सचिव दीपक माळी यांनीही या प्रस्तावाचे स्वागत केले असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या नियमित उपस्थितीवर आणि मूळ शिक्षणावर भर देणे शक्य होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

या नव्या प्रणाली अंतर्गत केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे, तर शिक्षकांच्या उपस्थितीचीही डिजिटल पडताळणी केली जाणार आहे. शिक्षण संचालकांच्या कार्यालयातून या संपूर्ण बायोमेट्रिक प्रणालीचे थेट नियंत्रण केले जाईल. यामध्ये वेळेनुसार स्वयंचलित हजेरी नोंदवली जाईल, तसेच एखादा विद्यार्थी गैरहजर राहिल्यास पालकांना त्वरित ऑनलाइन सूचनेद्वारे (डचड) कळवण्याची व्यवस्था असेल. सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचा उपस्थितीचा ऑनलाइन अहवाल संस्था स्तरावर नियमित तपासला जाईल. सरकारच्या या धाडसी निर्णयामुळे महाविद्यालयांमधील केवळ कागदावर असणारी हजेरी संपून प्रामाणिकपणे कॉलेज करणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळेल आणि शिक्षणाचा ढासळत चाललेला दर्जा सुधारण्यास मोठी मदत होईल.

# भोंदू दिवटेसह तिघांवर गुन्हा, कौटुंबिक समस्या सोडविण्याच्या बहाण्याने फसविले

पारनेर -

युवावार्ता (प्रतिनिधी)

मतिमंद मुलाचा आजार बरा करतो, भावाचे लग्न जमवून देतो, असे आमिष दाखवून एका महिलेची साडेसहा लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करून मुलाला मारण्याची धमकी देत भोंदूबाबाने तिच्यावर वारंवार शारीरिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात भोंदूबाबा, त्याचा मुलगा आणि एका महिला साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारनेर तालुक्यातील एका ४० वर्षीय महिलेचा मुलगा मतिमंद असून, भावाचे वय होऊनही लग्न जमत नव्हते, तसेच या कुटुंबावर कर्जाचा बोजाही वाढत होता. या महिलेला रुईछत्रपती (ता. पारनेर) येथील राजू बन्सी दिवटे, त्याचा मुलगा शशिकांत राजू दिवटे आणि त्यांची महिला सहकारी शोभा अविनाश तरटे (रा. म्हसणे, पारनेर) हे देवऋषी (देवभगत) असून, ते अडचणींवर तोडगा काढतात, अशी माहिती मिळाली होती. पीडितेने २०२० मधील कोरोना काळापासून या भोंदूबाबाकडे जाण्यास सुरुवात केली. त्यावेळी संशयित भोंदूबाबाने, 'तुमच्या कुटुंबाला बाधा आहे, त्यासाठी होमहवन व पूजा करावी लागेल,' असे सांगितले. मुलाच्या उपचारासाठी ३ ते ४ लाख आणि भावाच्या लग्नासाठी दीड लाख रुपये खर्च येईल,असे सांगून त्यांनी पीडितेकडून मुलाचे व भावाचे फोटो तंत्र-मंत्र करण्यासाठी मागवून घेतले. सुरुवातीला पूजा साहित्याच्या नावाखाली शोभा तरटे हिने १० हजार रुपये घेतले.

त्यानंतर पारनेर येथील मुख्य बाजारपेठेतील कॉम्प्लेक्समधील घरात देवीच्या फोटोसमोर होमहवन करून पीडितेला अंगारा व तीर्थ पिण्यास दिले. जानेवारी २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान पीडितेने २ लाख ५६ हजार ६८४ रुपये ऑनलाईन आणि एप्रिल २०२६ मध्ये २ लाख रुपये रोख, असे एकूण ४ लाख ५६ हजार रुपयांहून अधिक रक्कम राजू दिवटे याला दिली, तसेच भावाच्या विवाहासाठी एकूण एक लाख ९३ हजार ५३० रुपये ऑनलाईन व रोख स्वरूपात दिले. ही सर्व रक्कम पीडितेने कर्ज काढून दिली होती. पैसे उकळल्यानंतरही मुलाच्या तब्येतीत फरक पडला नाही. यादरम्यान आरोपी राजू दिवटे हा पीडितेला पूजेसाठी चारचाकी वाहनातून घेऊन जाताना प्रवासादरम्यान अश्लील वर्तन केले. त्यानंतर 'मुलाच्या उत्तम आयुष्यासाठी माझ्यासोबत शरीरसंबंध ठेवावे लागतील, नाहीतर तुझ्या मुलाच्या फोटोचे तुकडे करून देवीच्या कोपाने त्याला मारून टाकीन,' अशी धमकी दिली. दिवटे याने पीडितेला गुंगीचे रंगीत पाणी पाजून जानेवारी २०२५ ते १ मार्च २०२६ दरम्यान शारीरिक अत्याचार केला.

काहीही फरक न पडल्याने जेव्हा पीडितेने आणि तिच्या भावाने आपले पैसे परत मागितले, तेव्हा आरोपींनी दोघांनाही शिवीगाळ करत मारहाण केली. कोठेही तक्रार केली, तर समाजात बदनाम करीन, सासरी नांदू देणार नाही, अशी धमकी पीडितेला दिली. पीडितेने अखेर आपल्या सासू-सासऱ्यांना हा सर्व प्रकार सांगितला. त्यांनी धीर दिल्यानंतर पीडितेने पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यासह अत्याचार, फसवणूक आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला.

# राजस्थान हरले, पण वैभव चमकला

नवी दिल्ली (वार्ताहर)-

इंडियन प्रीमियर लीग २०२६ मधील दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स आमनेसामने आले होते. या लढतीत राजस्थानचा युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशी याने आपल्या आक्रमक फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अवघ्या १५ वर्षांच्या या खेळाडूने संघ अडचणीत असताना धावांची जबाबदारी खांद्यावर घेत ४६ चेंडूंमध्ये ९६ धावांची दमदार खेळी साकारली. मात्र वैभवची ही झुंजार खेळी राजस्थानला विजय मिळवून देऊ शकली नाही. गुजरात टायटन्सने सात गडी राखून सामना जिंकत अंतिम फेरीत धडक मारली, तर राजस्थान रॉयल्सचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.



सामन्यानंतर झालेल्या सादरीकरण समारंभात राजस्थानचा कर्णधार रियान पराग याने वैभव सूर्यवंशीच्या खेळीचे भरभरून कौतुक केले. वैभवबाबत बोलताना पराग म्हणाला की, त्याच्या फलंदाजीचे वर्णन करण्यासाठी आपल्याकडे शब्दच नाहीत. पहिल्या चेंडूपासून निर्भीडपणे फटकेबाजी करत तो ज्या प्रकारे खेळतो, ते खरोखरच अकल्पनीय असल्याचे त्याने सांगितले. परागने पुढे सांगितले की, वैभव केवळ आक्रमक फलंदाज नाही, तर खेळादरम्यान धावांचे गणित मांडणे, योग्य रणनीती आखणे आणि खेळपट्टीचा अंदाज घेणे ही कौशल्येही तो प्रभावीपणे वापरतो. एवढ्या कमी वयात त्याच्याकडे असलेली ही परिपक्वता आश्चर्यकारक असल्याचेही परागने नमूद केले.

राजस्थानचा कर्णधार म्हणाला की, वैभव भविष्यातही याच आत्मविश्वासाने आणि शैलीत खेळत राहील, असा त्याला विश्वास आहे. राजस्थान रॉयल्ससाठी तो आगामी काळात महत्त्वाची भूमिका बजावेल आणि संघाला दुसरे आयपीएल विजेतेपद मिळवून देण्यातही त्याचे मोठे योगदान असेल, असे परागने सांगितले. याचबरोबर वैभवच्या आंतरराष्ट्रीय भवितव्याबाबतही परागने मोठा विश्वास व्यक्त केला. तो भविष्यात भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करेल आणि देशासाठी मोठे नाव कमावेल, असा ठाम विश्वास त्याने व्यक्त केला. सामन्यानंतर परागने वैभव सूर्यवंशीच्या खेळीला मास्टरक्लास असे संबोधत तिचे विशेष कौतुक केले.

# लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श दीपस्तंभ
# राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

भारतीय इतिहासात अनेक राजे-राण्यांनी आपल्या पराक्रमाने, दूरदृष्टीने आणि लोकहितकारी कार्याने अजरामर स्थान प्राप्त केले आहे. मात्र, जनतेच्या कल्याणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या, न्यायप्रियता, धर्मनिष्ठा, करुणा आणि उत्कृष्ट प्रशासन यांचा अद्वितीय संगम असलेल्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आणि प्रेरणादायी आहे. त्यांचे संपूर्ण जीवन हे स्त्रीशक्ती, कर्तृत्व, त्याग आणि लोकसेवेचा आदर्श नमुना आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेताना प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटतो. अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील मानकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा फारशी नव्हती. परंतु, मानकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला धार्मिक, नैतिक आणि व्यावहारिक शिक्षण दिले. बालपणापासूनच अहिल्याबाई बुद्धिमान, संस्कारी, कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हे गुण पुढे त्यांच्या राज्यकारभारात स्पष्टपणे दिसून आले. एके दिवशी मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी चौंडी येथे मुक्काम केला असताना मंदिरात पूजा करणाऱ्या अहिल्याबाईंना पाहिले. त्यांच्या साधेपणाने आणि संस्कारांनी प्रभावित होऊन मल्हाररावांनी आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह लावून दिला. विवाहानंतर अहिल्याबाई इंदूरच्या होळकर घराण्यात आल्या आणि तेथून त्यांच्या आयुष्याचा नवा प्रवास सुरू झाला. होळकर घराण्यात आल्यावर अहिल्याबाईंनी राजकारण, प्रशासन, सैन्य व्यवस्था आणि समाजकारण यांचा अभ्यास केला. मल्हारराव होळकर यांनी त्यांना विविध जबाबदाऱ्या देऊन प्रशासनाचे धडे दिले. त्यामुळे राज्यकारभारातील त्यांचे ज्ञान अधिक समृद्ध झाले. त्या केवळ राजघराण्यातील स्त्री न राहता एक सक्षम प्रशासक म्हणून घडत गेल्या. मात्र, त्यांच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. १७५४ मध्ये खंडेराव होळकर यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर काही वर्षांनी मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. पुढे त्यांचा पुत्र मालेराव याचाही मृत्यू झाला. अशा सलग दुःखद घटनांनी कोणतीही व्यक्ती खचून जाईल; परंतु, अहिल्याबाईंनी धैर्याने परिस्थितीचा सामना केला. त्यांनी वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून राज्य आणि प्रजेची जबाबदारी स्वीकारली.

१७६७ मध्ये त्यांनी होळकर राज्याची सूत्रे हाती घेतली. त्या काळात महिलांना राज्यकारभाराची संधी मिळणे ही अत्यंत दुर्मिळ बाब होती. परंतु, आपल्या बुद्धिमत्ता, दूरदृष्टी आणि प्रशासन कौशल्याच्या जोरावर त्यांनी एक आदर्श राज्य उभे केले. त्यांचा राज्यकारभार हा लोकाभिमुख, न्यायनिष्ठ आणि विकासाभिमुख होता. अहिल्याबाईंच्या प्रशासनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची न्यायप्रियता. त्यांच्या दरबारात प्रत्येकाला न्याय मिळत असे. गरीब, शेतकरी, व्यापारी, महिला किंवा सामान्य नागरिक यांच्याशी कोणताही भेदभाव केला जात नसे. न्याय देताना त्या कोणाच्याही दबावाखाली येत नसत. त्यामुळे त्यांच्या राज्यात कायद्याचा आदर आणि लोकांचा विश्वास कायम राहिला. शेती हा त्या काळातील अर्थव्यवस्थेचा कणा होता. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कल्याणाला त्यांनी विशेष महत्त्व दिले. दुष्काळ, नैसर्गिक



आपत्ती किंवा अन्य संकटांमध्ये शेतकऱ्यांना मदत केली जात असे. करव्यवस्थेत सुसूत्रता आणून शेतकऱ्यांवरील अन्याय कमी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ झाली आणि ग्रामीण भागाचा विकास साधला गेला. व्यापार आणि उद्योगांनाही त्यांनी मोठे प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेची हमी दिल्यामुळे अनेक व्यापारी इंदूरकडे आकर्षित झाले. त्यांच्या काळात इंदूर हे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र म्हणून विकसित झाले. चांगले रस्ते, बाजारपेठा आणि दळणवळणाच्या सुविधा निर्माण करून आर्थिक विकासाला चालना दिली.

अहिल्याबाईंचे आणखी एक महान कार्य म्हणजे देशभरात त्यांनी उभारलेली मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा आणि सार्वजनिक बांधकामे. त्यांनी केवळ आपल्या राज्यापुरते कार्य मर्यादित ठेवले नाही, तर संपूर्ण भारतातील धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांच्या जतनासाठी योगदान दिले. काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार, सोमनाथ मंदिराचा विकास, उज्जैन, गया, द्वारका, रामेश्वर, हरिद्वार, नाशिक, पंढरपूर यांसारख्या अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये त्यांनी विविध बांधकामे केली. त्यांच्या या कार्यामागे केवळ धार्मिक भावना नव्हती, तर समाजहिताची व्यापक दृष्टी होती. यात्रेकरूंना निवास, पिण्याचे पाणी आणि सुरक्षितता मिळावी यासाठी त्यांनी धर्मशाळा आणि घाट उभारले. त्यामुळे लाखो लोकांना त्याचा लाभ झाला. अहिल्याबाई होळकर या स्त्रीशक्तीचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. त्यांनी सिद्ध करून दाखवले की स्त्रिया कोणत्याही क्षेत्रात पुरुषांपेक्षा कमी नाहीत. अत्यंत कठीण परिस्थितीतही त्यांनी नेतृत्व केले, निर्णय घेतले आणि यशस्वी राज्यकारभार करून दाखवला. आज महिलांच्या सक्षमीकरणाविषयी चर्चा होत असताना अहिल्याबाईंचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा आणि विनम्रता होती. मोठ्या साम्राज्याच्या राणी असूनही त्या अत्यंत साधे जीवन जगत असत. राजवैभवाचा दिखावा त्यांना आवडत नसे. त्या नियमितपणे धार्मिक कार्य, लोकांशी संवाद आणि समाजसेवेत सहभागी होत असत. त्यांच्या जीवनशैलीतून कर्तव्यनिष्ठा, संयम आणि सेवा वृत्ती दिसून येते. अहिल्याबाईंच्या काळात शिक्षण, संस्कृती आणि धार्मिक सहिष्णुतेलाही महत्त्व देण्यात आले. विविध पंथ आणि धर्मांच्या लोकांना त्यांनी समान वागणूक दिली. त्यांच्या राज्यात शांतता आणि सामाजिक सलोखा कायम राहिला. हीच त्यांच्या प्रशासनाची खरी ताकद होती.

आजच्या काळातही त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची आवश्यकता आहे. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, लोकाभिमुख विकास, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि सांस्कृतिक वारशाचे जतन या क्षेत्रांत त्यांचे कार्य आदर्श मानले जाते. आधुनिक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि समाजसेवक यांनी त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याची गरज आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिक्षण संस्था, साकुरच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहोत. यासाठी अहिल्याबाईंचे जीवन आमच्यासाठी प्रेरणास्त्रोत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा अभ्यास करून समाजासाठी योगदान देण्याचा संकल्प करावा, हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले की सत्ता ही लोकसेवेसाठी असते. जनतेचे सुख, सुरक्षितता आणि विकास हेच राज्यकर्त्याचे अंतिम ध्येय असावे. त्यांनी आपल्या प्रजेवर मातेसमान प्रेम केले आणि त्यामुळेच त्यांना लोकमाता हा मान मिळाला. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून इतिहासाने त्यांना पुण्यश्लोक ही उपाधी दिली आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या महान कार्याला अभिवादन करूया. त्यांच्या आदर्शांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करूया. समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे, शिक्षणाचा प्रसार करणे, महिला सक्षमीकरणासाठी कार्य करणे आणि लोकहिताला प्राधान्य देणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या केवळ एका राज्याच्या राणी नव्हत्या, तर त्या संपूर्ण भारताच्या प्रेरणास्थान आहेत. त्यांचे कार्य, विचार आणि मूल्ये यांचा प्रकाश पुढील अनेक शतकांपर्यंत समाजाला दिशा देत राहील. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**– इंद्रजित खेमनर**
**अध्यक्ष, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिक्षण संस्था, साकूर, ता. संगमनेर (अ.नगर)**

# संगमनेरमध्ये दोन दिवसांच्या'पुरुषोत्तम यागा'ची पूर्णाहुती व महाप्रसादाने उत्साहात सांगता



संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठान, संगमनेर यांच्या वतीने दिनांक २७ व २८ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय 'पुरुषोत्तम यागा'ची सांगता भक्तीमय आणि उत्साही वातावरणात झाली. यागाची पूर्णाहुती आणि त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता झाली. प्रतिष्ठानच्या वतीने नियोजनबद्ध रीतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या द्वि-दिनात्मक पुरुषोत्तम यागामध्ये वेदशास्त्रसंपन्न पुरोहितांच्या मंत्रोच्चारात आणि शास्त्रोक्त पद्धतीने विविध धार्मिक विधी पार पडले. विश्वाच्या कल्याणासाठी आणि सुख-समृद्धीसाठी या यागाचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी मुख्य हवन आणि पूर्ण विधी झाल्यानंतर मुख्य पुरोहितांच्या हस्ते 'पूर्णाहुती' देण्यात आली. यावेळी उपस्थित भाविकांनी जयघोष करत दर्शन घेतले. समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या सोहळ्यास उपस्थिती दर्शविली. पदविधर आमदार सत्यजीत तांबे, नगराध्यक्षा मैथिली तांबे, राहूल खताळ, सर्व नगरसेवक, नगरसेविका, यांसह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक आणि धार्मिक क्षेत्रातील नामांकित व्यक्तींचा समावेश होता. प्रतिष्ठानच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

यागाची पूर्णाहुती झाल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संगमनेर शहर व परिसरातील हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. वैदिक संस्कृतीचे जतन व्हावे आणि विश्व शांती व जनकल्याण हेतू, सर्वांना सुख-शांती लाभावी, या उद्देशाने वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठानने या पुरुषोत्तम यागाचे आयोजन केले होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास जोशी गुरूजी, उपाध्यक्ष चेतन मुळे गुरूजी, सचिव डॉ. वैभव उपासनी गुरूजी, सह. सचिव प्रमोद जोशी गुरूजी, खजिनदार त्रुषिकेश मुळे गुरूजी, तसेच स्वप्निल मुळे गुरूजी, महेश सांबरे गुरूजी, समीर सराफ गुरूजी, उत्कर्ष जोशी गुरूजी, ओंकार मुळे गुरूजी, महेश मुळे गुरूजी, आदित्य जोशी गुरूजी, सौरभ मुळे गुरूजी, निखिल उपासनी गुरूजी, अक्षय जाजडा गुरूजी, रवि तिवारी, योगेश नाके, मल्हार सराफ, व सर्व सदस्य, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

